cmyk

## संपादकीय

### राजकारण्यांना गचाळ विचारांची लागण !

एखाद्या गल्लीमध्ये किंवा शाळकरी पोरांमध्ये जेव्हा भांडणे होतात तेव्हा समोरच्याला दुखावण्यासाठी ही पोरे किंवा गल्लीतले गुंड ज्या प्रकारे शिवीगाळ करतात किंवा किंवा अतिशय खालच्या पातळीवरील भाषा वापरतात तशाच प्रकारे राजकीय नेतेही भाषा वापरू लागले तर राजकारणाची पातळी किती घसरली आहे याची कल्पनाच करता येणार नाही. गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर केलेली वैयक्तिक टीका हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. गेल्या कालावधीमध्ये अशी अनेक उदाहरणे समोर येताना दिसतात.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१४६ | रविवार, दि.२१ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


### अभिनेते मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

मुंबई: मल्याळम चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते मोहनलाल यांना प्रतिष्ठेचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने शनिवारी (दि.२१) याबाबतची घोषणा केली. २०२३ साठी दिला जाणार दादासाहेब फाळके पुरस्कार २३ सप्टेंबर रोजी प्रदान केला जाणार आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने त्यांच्या एक्स अकाउंटवर पोस्ट शेअर करत म्हटले, ''मोहनलाल यांचा चित्रपट प्रवास अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे. या महान अभिनेत्याला, दिग्दर्शकाला आणि निर्मात्याला भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी या पुरस्काराने गौरवण्यात येत आहे. २३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना प्रदान केला जाणार आहे.

# पिकांची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी संशोधनावर भर द्या !

## राज्याच्या आढावा बैठकीत कृषीमंत्री दत्ता भरणे यांचे विद्यापीठांना निर्देश

अकोला । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी, पिकांची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अधिक संशोधन होण्याची गरज कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी व्यक्त केली. तसेच शेतकऱ्यांच्या अडचणींवर योग्य शास्त्रीय उपाय करण्यासाठी विद्यापीठांनी नवे प्रयोग आणि नवकल्पना राबवाव्यात, असेही निर्देशही त्यांनी दिले.**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे शनिवारी (दि.२०) आढावा बैठक झाली. या बैठकीस राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांचे कुलगुरू व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत, विद्यापीठांचे कार्यक्षेत्र, सध्याच्या अडचणी व पुढील गरजांबाबत सविस्तर चर्चा झाली.या बैठकीत शेती क्षेत्राबाबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीत ठरल्याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी नवी वसतिगृहे उभी करण्यात येणार असून, विद्यापीठांमध्ये लागणाऱ्या पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठांचे कामकाज सुधारण्यास मदत होईल, असेही कृषीमंत्री यांनी सांगितले. बैठकीदरम्यान, कृषीमंत्र्यांनी पान २ वर



### कृषी विद्यापीठांतील रिक्त पदे पंधरा दिवसांत भरणार

राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये अनेक वर्षांपासून पदभरती झाली नसल्यामुळे शिक्षण, संशोधन आणि इतर कामांवर परिणाम झाला असल्याचे समोर आले. प्राध्यापक आणि कर्मचारी यांची कमतरता भासत असल्याने कामकाज नीटपणे होत नाही. या अडचणीवर उपाय म्हणून सरकारने ठोस पावले उचलली असून, पुढील १५ दिवसांत पदभरती प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

## थोडक्यात...

### रेल्वेकडून रेल नीरचे पाणी स्वस्त!

दिल्लीः केंद्र सरकारने जीएसटी दरांमध्ये मोठी कपात केल्यानंतर त्याचा फायदा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक कंपन्यांनी आपल्या उत्पादनांच्या किंमती कमी केल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर आता भारतीय रेल्वेनेही आपल्या प्रवाशांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे मंत्रालयाने रेल नीर या ब्रँडच्या पाण्याच्या बाटल्यांच्या दरात कपात केली आहे. रेल्वे आणि रेल्वे स्थानकांवर मिळणाऱ्या रेल नीरच्या १ लीटर आणि अर्धा लीटर पाण्याच्या बाटल्यांच्या किमती आता कमी होणार आहेत. जीएसटी कपातीचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने रेल नीरच्या पाण्याच्या बाटल्यांचे कमाल विक्री मूल्य कमी केले आहे. या निर्णयानुसार, यापूर्वी १५ रुपयांना मिळणारी १ लीटर पाण्याची बाटली आता १४ रुपयांना मिळेल.

### भिकाऱ्याला पोटगी देण्याचे निर्देश देता येणार नाहीत

तिरूअनंपूरम : भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या व्यक्तीला पत्नीने पोटगीची मागणी केली तरीही फौजदारी दंड संहिता कलम १२५ नुसार पोटगी देण्याचे निर्देश दिले जाऊ शकत नाहीत, असे केरळ उच्च न्यायालयाने एका निकालात म्हटले आहे. भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या व्यक्तीच्या गरजू पत्नीचे राज्याने योग्य उपाययोजना करून संरक्षण करणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पती भीक मागून महिन्याला सुमारे २५ रुपये कमावतो, असा दावा करत पत्नीने पोटगी मंजुरीसाठी कौटुंबिक न्यायालयात अर्ज केल होता. न्यायालयाने तिची मागणी फेटाळली.

### गरबा खेळण्यासाठी फक्त हिंदूनाच प्रवेश द्या-विहिंप

विश्व हिंदू परिषदेने नवरात्रीशी संबंधित अटी जारी केल्या आहेत. महाराष्ट्रातील गरबा कार्यक्रमांमध्ये फक्त हिंदूनाच प्रवेश दिला पाहिजे आणि गैर-हिंदूनी त्यात भाग घेऊ नये, यासाठी प्रवेशद्वारांवर आधार कार्ड तपासणी करावी, आदी अटींचा यामध्ये समावेश आहे. दरम्यान, ही नियमावली समाजात तेढ निर्माण करणारी असल्याची टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. तर भाजप नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, पोलिसांच्या परवानगीने कार्यक्रम आयोजित केला जात असेल तर आयोजकांना प्रवेशाच्या अटी घालण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे. विश्व हिंदू परिषदेने म्हटले आहे की, गरबा कार्यक्रम आयोजकांनी प्रवेशद्वारांवर आधार कार्ड तपासावेत आणि सहभागींना नाव लावायला सांगावे. कार्यक्रमात गरबा खेळण्यापूर्वी पूजाही सक्तीने करावी. विहिंप आणि बजरंग दलाचे सदस्य राज्यभरातील गरबा कार्यक्रमांवर सक्रियपणे लक्ष ठेवतील, असेही सांगण्यात आले आहे.

### बोगस दिव्यांगांवर होणार कारवाई

मुंबई : धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे बऱ्याच दिवसांनंतर ॲक्शन मोडवर आल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या त्यांच्याकडे राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदाची जबाबदारी असून दिव्यांगांसाठीच्या योजनांचा लाभ बोगसगिरीने घेणाऱ्यांविरुद्धची मोहीम त्यांनी सुरू केलीय. राज्यातील बोगस दिव्यांगांची झाडाझडती घेण्याचे लेखी आदेश गुरुवार १८ सप्टेंबर रोजी राज्याचे तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व ३४ जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे, सचिवांकडून आदेश मिळताच मुख्याधिकाऱ्यांनी दिव्यांग प्रमाणपत्रांच्या पडताळणीला सुरुवात केली आहे. विशेष म्हणजे झेडपीच्या शिक्षण, आरोग्य, बांधकाम विभागासह सर्व विभागांतर्गत असलेले सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्र घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले असून प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांचीही झोप उडाली आहे.

# राज्यात होणार २० नवीन जिल्हे अन् ८१ तालुके

## महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले संकेत

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील प्रशासकीय रचना बदलण्याच्या चर्चेला पुन्हा एकदा उधाण आले आहे. राज्यात तब्बल २० नवीन जिल्हे आणि ८१ तालुके निर्माण करण्याचा प्रस्ताव सरकारसमोर आल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रपूर येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तसे संकेत दिले. मात्र, मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत २०२१ ची जनगणना होऊन तिचा अहवाल येत नाही, तोपर्यंत नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीवर कोणताही निर्णय घेतला जाणार नाही. बावनकुळे यांनी केलेल्या या वक्तव्यानंतर राज्यभरात चर्चा होऊ लागली आहे.



महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे आणि ३५७ तालुके आहेत, जे सहा विभागांत विभागले गेले आहेत नवीन जिल्हे आणि तालुके निर्माण करण्याची मागणी गेल्या दोन वर्षांपासून सुरू आहे. २०२३ मध्ये तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत या चर्चांना पूर्ण विराम दिला होता. कारण नवीन जिल्हा निर्माण करण्यासाठी प्रति जिल्हा किमान ३५० ते ५०० कोटी रुपयांचा खर्च येतो, ज्यात मुख्यालयाची जागा, इमारती, कर्मचारी आणि प्रशासकीय सुविधा यांचा समावेश असतो. याशिवाय, जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणावरून स्थानिक पातळीवर वाद उद्भवतात, ज्यामुळे प्रस्ताव रखडले पान २ वर

# कराडचा राईट हॅण्ड गोट्या गित्तेसह ५ जणांचा मोक्का रद्द

बीड। प्रतिनिधी

**वाल्मिक कराडचा कट्टर समर्थक असलेल्या रघुनाथ फड गँगवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. परळी तालुक्यातील सहदेव सातभाई यांच्यावर हल्ला करत हत्येचा प्रयत्न केल्या प्रकरणी बीड पोलिसांनी ७ जणांवर मोक्का अंतर्गत कारवाई केली होती. पण, यामधून आता ५ जणांना दिलासा देण्यात आला आहे. पोलिस महासंचालकांनी त्यांच्यावरील मोक्का रद्द केला आहे.**

गेल्या वर्षी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून हत्या केल्याचे प्रकरण चांगलेच गाजले होते. या प्रकरणात वाल्मिक कराडसह त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल केले होते. यानंतर जिल्ह्यातील इतर चार टोळयांवरही मोक्काअंतर्गत कारवाई केली गेली. यात फड गँगचाही समावेश होता.



मात्र फड गँगमधील पाच आरोपींवर मोक्का रद्द केल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. गोट्या गित्ते हा वाल्मिक कराडचा राईट हँड असून तो अद्याप फरार आहे. त्याला अटक न करताच, चौकशी करण्याआधीच मोक्कातून त्या वगळल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. गोट्या गित्ते, जगन्नाथ फड, संदीप सोनवणे, बालाजी पान २ वर

# एसटी महामंडळात १७ हजार पदांसाठी मेगाभरती

## प्रताप सरनाईकांची बेरोजगार तरुणांसाठी मोठी भेट

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) ने बेरोजगार तरुणांसाठी एका मोठ्या संधीची घोषणा केली आहे. येत्या काळात ८,००० नवीन बसेसच्या अधिग्रहणासाठी मनुष्यबळाची तीव्र गरज असल्याने, एसटी महामंडळात १७,४५० कंत्राटी पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. यात मुख्यतः चालक आणि कंडक्टर अशा पदांचा समावेश आहे. परिवहन मंत्री तथा एसटीचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या निर्णयाची माहिती देताना सांगितले की, हा निर्णय महामंडळाच्या पान २ वर




### अशी असेल अर्ज प्रक्रिया?

ही मेगाभरती ई-निविदा प्रक्रियेद्वारे राबवली जाईल. येत्या २ ऑक्टोबरपासून निविदा प्रक्रिया सुरू होईल आणि ती सहा प्रादेशिक विभागनिहाय (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती) पार पडेल. इच्छुक उमेदवारांना अधिकृत वेबसाइटवरून अर्ज करता येतील. ही संधी १०वी उत्तीर्ण आणि त्यानुसार पात्र असलेल्या तरुणांसाठी खुली आहे.

# गटशिक्षण अधिकाऱ्याचे विद्यार्थीनीशी अश्लिल चाळे

केज । प्रतिनिधी

**नववीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनीला गाडीत बसवून पुढे रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत गाडी थांबवून तिच्याशी अश्लिल चाळे करणाऱ्या केजचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर (रा.उमरी रोड, केज) याच्या विरुध्द केज पोलिस ठाण्यात विनयभंगासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

केज पोलिस ठाण्यात पिडित विद्यार्थीनीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी व माझी मानलेली मावशी आणि त्यांची लहान मुलगी असे आम्ही वाढदिवसाचा केक आणण्यासाठी गेलो असता, लक्ष्मण बेडसकर हे त्यांची स्विफ्ट कार घेवून आले व आम्हाला गाडीत बसायला लावले. त्यानंतर गाडी शहरापासून काही अंतरावर नेवून रस्त्याच्या कडेला थांबवली आणि बेडसकर याने वाईट हेतूने माझा हात धरून अश्लिल कृत्य केल्याने आम्ही ओरडू लागलो. त्याचवेळी पाठीमागून एक कार येवून तिथे थांबली. कारचा उजेड पाहून बेडसकर तेथून पळून गेला. त्या गाडीत माझे आई व इतर होते पान २ वर

# राज्यातील पाच सहकारी बँकांवर कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया राष्ट्रीयीकृत, खासगी, सरकारी, अर्बन बँकांकडून बँकिंग रेग्युलेशन कायदा आणि बँकिंग संदर्भातील इतर नियमांचे पालन केले जात की नाही यावर आरबीआयकडून नियंत्रण ठेवले जाते. ज्या बँका किंवा वित्तीय संस्था नियमांचे पालन करत नाहीत, त्यांच्यावर आरबीआयकडून कारवाई केली जाते. महाराष्ट्रातील तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश आहे तर मुंबईतील एक आणि अहमदाबादमधील एका बँकेवरही कारवाई केली.

रिझर्व्ह बँकेने द जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लिमिटेड, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या तीन जिल्हा बँकांवर कारवाई केली. या बँकांना आर्थिक दंड करण्यात आला. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला १५ सप्टेंबरच्या आदेशानुसार ३.५० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. यामध्ये नो यूवर कस्टमर संदर्भातील नियम आणि मार्गदर्शक सूचनांची पूर्तता न केल्याने दंड ठोठावण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेलाही १५ सप्टेंबरच्या पान २ वर

# भारताचे पंतप्रधान कमकुवत

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हिसा निर्णयावरून राहुल गांधी यांची नरेंद्र मोदी यांच्यावर टीका

नवी दिल्ली । वृतसंस्था

अमेरिकेने अत्यंत कुशल कामगारांसाठी एच-१ बी व्हिसावर वार्षिक १००,००० अमेरिकन डॉलर्स (सुमारे ८८ लाख रुपये) शुल्क लादल्यानंतर काँग्रेसने शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तीव्र हल्ला चढवला, या निर्णयामुळे भारतीय व्यावसायिकांना सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधानांना ''कमकुवत'' नेते म्हटले, तर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही पंतप्रधान मोदी यांच्यावर परराष्ट्र धोरणावरून जोरदार आरोप केले.



डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी एच-१ बी वर्कर व्हिसासाठी कंपन्यांना दरवर्षी १००,००० अमेरिकन डॉलर्स देण्याचे बंधनकारक करणाऱ्या आदेशावर स्वाक्षरी केली, ज्यामुळे काही मोठ्या टेक कंपन्यांनी व्हिसा धारकांना अमेरिकेत राहण्याचा किंवा पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२० सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.५० क्विंटल | २,४०० | ३,०३० | २,६४९ |
| ज्वारी/हायब्रिड: १४०.५० क्विंटल | १,९५० | ३,२५१ | २,३९० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १८.०० क्विंटल | ४,२०० | ६,१२१ | ५,४६४ |
| उडीद : ५८.०० क्विंटल | ४,८०० | ६,१५१ | ५,२९७ |
| बाजरी: ४३.५० क्विंटल | २,१४० | २,७८१ | २,५४७ |
| मुग: ३.५० क्विंटल | ३,५०० | ५,२०० | ४,५०० |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ३,७२५ | ४,२०० | ३,९४३ |
| हरभरा:२.०० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

# स्व.यशवंतरावांच्या महाराष्ट्रात नेत्यांची निती अन मती ढासळतेय

सुभाष चौरे । बीड

**महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळातील राजकारण आणि सद्यस्थितीतील राजकारणात यात जमीन आसमानचा फरक आहे. आजकालची नेते टीका टिप्पणी, थेट गंभीर स्वरूपाचे आरोप तेही सुसंस्कृत महाराष्ट्राला न शोभणारे करत आहेत, मग ते पडळकर, राणे, हाके असो की जरांगे. इथपर्यंत नेत्यांचा स्तर चांगलाच घसरला असल्याचे दिसून येते. हे सुसंस्कृत महाराष्ट्रासाठी अशोभनीय म्हणावे लागेल. अश्या बोलण्या वागण्यातून नव्या पिढीने काय आदर्श घ्यावा हा मोठा चिंतनाचा विषय बनला आहे.**




यशवंतराव, वसंतदादा ते विलासराव देशमुख या कार्यकाळातील राजकारण सुसंस्कृतपणाचे दर्शन घडवणारे होते. प्रत्येक नेता सत्ताधारी असो की विरोधक एकमेकांना आदर द्यायचे. आरोप करताना त्यांच्या हृदयाला इजा होणार नाही याची पुरेपूर काळजी घ्यायचे. बोलताना संयम असायचा. विरोध करतानाही तो आदराचा विरोध असायचा, परंतु आजकाल अनेक पक्षाचे नेते थेट जातीवर, व्यक्तिगत कुटुंबावर आरोप करत आहेत जे महाराष्ट्राला शोभणारे नाही. अशा नेत्यापासून पुढे घडणाऱ्या नेत्यांनी काय आदर्श घ्यावा हाच मोठा प्रश्न आता महाराष्ट्राला पडला आहे. यशवंतराव ते विलासराव या नावाचे पत्रकार मधुकर भावे यांचे पुस्तक एकदा डोळ्याखालून काढले की त्या काळाचे राजकारण समजून येते. परंतु आता स्थिती आणि परिस्थिती बदलली आहे. नेते आणि राजकारण देखील बदलले आहे. राजकारण तेच असले तरी नेत्याच्या तोंडून निघणारी भाषा गंभीर स्वरूपाची आहे. भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयंत पाटील यांच्या विषयी केलेले वक्तव्य गंभीर स्वरूपाचे आहे. असे वक्तव्य या महाराष्ट्राला न शोभणारे आहे. देशातील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपकडे असे असंस्कृत नेते असतील तर नव्या पिढीने काय आदर्श घ्यायचा.? यापूर्वी मंत्री राणे, खासदार संजय राऊत, शिवसेनेचे संजय गायकवाड आदींची वक्तव्य ऐकले पान २ वर

cmyk

अग्रलेख

# राजकारण्यांना गचाळ विचारांची लागण !

एखाद्या गल्लीमध्ये किंवा शाळकरी पोरांमध्ये जेव्हा भांडणे होतात तेव्हा समोरच्याला दुखावण्यासाठी ही पोरे किंवा गल्लीतले गुंड ज्या प्रकारे शिवीगाळ करतात किंवा किंवा अतिशय खालच्या पातळीवरील भाषा वापरतात तशाच प्रकारे राजकीय नेतेही भाषा वापरू लागले तर राजकारणाची पातळी किती घसरली आहे याची कल्पनाच करता येणार नाही. गोपीचंद पडळकर यांनी जयंत पाटील यांच्यावर केलेली वैयक्तिक टीका हे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. गेल्या कालावधीमध्ये अशी अनेक उदाहरणे समोर येताना दिसतात. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्यानंतर एकनाथ शिंदे यांचे उजवे हात आणि सहकारी नरेश म्हस्के यांनीही अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन संजय राऊत यांचा उल्लेख केला.

एकमेकांविषयी आदराने उल्लेख करणे तर बाजूलाच राहिले आहे, आता तर 'अरे तुरे'ची भाषाच सर्रास बोलली जात आहे. मनोज जरांगे यांनीसुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मातेबाबतही अशीच आक्षेपार्ह विधाने केली होती. बिहारमध्ये एका सभेमध्येही नरेंद्र मोदी यांच्या मातेबाबत अनुदार उद्गार काढण्यात आले होते. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्याबाबतही अनेकदा चुकीचे बोलले जाते. या सर्व घटना कमी होत्या म्हणून की काय उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाची विटंबना करण्याचे कामही काही समाजकंटकांनी केले. राजकीय नेत्यांना आपल्या शब्दांनी नामोहरम करताना विरोधी नेत्यांच्या मातेचा आणि पित्याचा उद्धार केल्याशिवाय आपला विचार त्या नेत्यापर्यंत पोहोचणार नाही हा एक चुकीचा समज सर्वच राजकीय नेत्यांच्या मनात निर्माण झालेला दिसतो. राजकीय नेता असो किंवा सर्वसामान्य नागरिक असो त्याला जेव्हा त्याचे आई-बापाविषयी काही चुकीचे बोलले जाते तेव्हा त्याला राग येणे साहजिक असते आणि अनेक वेळा राजकीय पातळीवर आपला मुद्दा खरा असो किंवा नसो समोरच्याला दुखावण्याच्या हेतूनेच जेव्हा अशी काही विधाने केली जातात तेव्हाच खालच्या पातळीवर उतरून आई आणि बापाचा उद्धार केला जातो. दुर्दैवाने महाराष्ट्रातील राजकारणाला अशाच प्रकारची लागण झालेली दिसते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या कुस्तीतील डावपेचाप्रमाणे ही डायलॉगबाजीची हमरीतुमरी सुरू ठेवली जाते. समोरच्या व्यक्तीने चुकीच्या पद्धतीने टीका केली तर त्याला उत्तरसुद्धा चुकीच्या पद्धतीने टीका करूनच दिले जाते आणि अशी ही घसरलेली पातळी अधिकच घसरत जाते. एखाद्या जुगलबंदीप्रमाणे ही शिव्या देण्याची किंवा खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्याची मोहीम सुरूच राहते. महाराष्ट्राचे वर्णन नेहमी सुसंस्कृत, पुरोगामी, सुशिक्षित अशी विशेषणे वापरून केले जाते. त्याच महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची राजकीय संस्कृती समोर येत आहे ही अत्यंत क्लेशदायक बाब म्हणावी लागेल. आपला मुद्दा मांडण्यासाठी किंवा रेटण्यासाठी शालजोडीतील उपहासात्मक पद्धतीचा वापर करूनही सुसंस्कृत पद्धतीने टीका करता येते; पण विद्यमान महाराष्ट्रातील राजकारण्यांना अशा प्रकारची सुसंस्कृत टीका मान्य नसावी.

शिवीगाळ करून आपला मुद्दा त्याच्यापर्यंत पोहोचला जातो असा एक समज राजकीय नेत्यांनी निर्माण करून घेतला आहे. हा समज निश्चितच घातक आहे आणि सर्वच राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांनी याची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. आचार संहिता केवळ निवडणुकीच्या काळात नसते तर एरवीसुद्धा याची आचारसंहिता पाळावी लागते हा विषय सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी तळागाळापर्यंत पोहोचवायला हवा. अशाप्रकारे खालच्या पातळीवर जाऊन टीका करून समोरचा फक्त दुखावला जातो, बाकी काही सिद्ध होत नाही. उलट अशा प्रकारे टीका करणाऱ्यांची पातळीच समोर येते हे वास्तवही या निमित्ताने लक्षात घ्यायला हवे.

सध्या कोणतीही निवडणूक नसतानासुद्धा जर अशा प्रकारची शेरेबाजी केली जात असेल तर निवडणूक जाहीर झाल्यावर ही पातळी आणखीन किती खाली जाईल याची कल्पना करायला नको. म्हणूनच राजकीय पक्षांनी आपल्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी कसे बोलावे आणि काय बोलावे याबाबत एक कार्यशाळा आयोजित करणे ही आता काळाची गरज बनली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशी आक्षेपार्ह आणि शिवराळ विधाने करणाऱ्या नेत्यांवर वेळीच कारवाई करण्यात आली तरच अशा प्रकारे विधाने करण्यावर नियंत्रण बसू शकते.

# आम्हा आंदोलकांना बीड रेल्वे सुरू झाल्याचा परमोच्च आनंद

कारण सन १९८५ ला सुरेश आण्णा नवले यांचे नेतृत्वाखाली बलभीम महाविद्यालय, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, नवगण कॉलेज आणि इतर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संसदा आमच्या ताब्यात असताना आणि साहेब स्वतः बलभीम महाविद्यालयाचे विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष असताना त्या काळापासून बीडला रेल्वे सुरू व्हावी म्हणून आंदोलन पुकारले होते आणि सक्रिय सहभाग नोंदवला होता तदनंतर रेल्वे कृती समिती तर्फे वेळोवेळी झालेल्या आंदोलनामध्ये सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींना सोबत घेऊन अनेक वेळा प्रखर आंदोलने केली मा. आ. श्री .राजेंद्रजी जगताप साहेब यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे कृती समितीमध्ये आंदोलन केले जेलमध्ये सुद्धा जावे लागले त्यानंतर १९९६-९७ मध्ये स्व. ना. गोपीनाथराव मुंडे साहेब, खा. रजनीताई पाटील यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री ना. रामविलास पासवान साहेब यांच्या उपस्थितीत बीडला रेल्वे परिषदेचे आणि सभेचे आयोजन चंपावती मैदानावर केले होते. त्यावेळी हजारो महिला पुरुष आणि आंदोलकांच्या उपस्थितीमध्ये रेल्वे स्थानकाचे भूमिपूजन केले होते त्यावेळेस साहेबांचा बेस्ट बसणे अपघात झाल्यामुळे ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत म्हणून सबंध शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांच्या वतीने मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख म्हणून कार्यक्रमाचा प्रमुख अतिथी होतो त्यावेळेस मी माझ्या भाषणामध्ये रेल्वेसाठी विद्यार्थ्यांनी, कामगारांनी, शेतकऱ्यांनी, शेतमजुरांनी, व्यापाऱ्यांनी डावे-उजव्या कम्युनिस्ट पक्षांनी, शिवसेना, भाजपा पक्षांनी कसे आंदोलने केले याचा ३५ मिनिटांचा भाषणामध्ये विस्तृतपणे मांडले होते त्यावेळेस जनतेतून प्रचंड टाळ्या वाजवून सर्वांचा प्रतिसाद मिळाला होता त्यानंतर सुद्धा रेल्वे आंदोलनामध्ये आम्ही सर्वजण सहभागी होतो त्यावेळी शिवसेना व भारतीय विद्यार्थी सेनेच्या वतीने सुद्धा वेळोवेळी आंदोलने करण्यात आली.

२००८ मध्ये नवले साहेब यांची विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर साहेबांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये लक्षवेधी मांडून, तारांकित प्रश्न उपस्थित करून महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने अर्धा-अर्धा वाटा उचलावा आणि हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी केली होती तोच धागा पकडून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख साहेब यांनी या मागणीला पाठिंबा दिला आणि त्याप्रमाणे प्रस्ताव केंद्राकडे दाखल करून या प्रस्तावाला मंजुरी दिली.

याप्रमाणे शिवसेनेने रेल्वे मंजुरीसाठी मागणी, आंदोलने आणि पाठपुरावा करून सक्रिय सहभाग नोंदवलेला आहे यामध्ये स्व. अमोल भैया गलधर, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख रावसाहेब गुजर, माजी जिल्हाप्रमुख विजय अण्णा बहिर, माजी जिल्हाप्रमुख किशोर उबाळे, माजी पर्यटन संचालक श्री. दिलीप भाऊ धूत, अनिलजी घुमरे, तत्कालीन शेतकरी सेनेचे प्रमुख प्रभाकर आप्पा कोलगडे, शिवसेनेचे नगरसेवक सुधिरजी थीगळे, स्व. पुष्पाताई मनुरकर, वसंतरावजी थिगळे, किशोर काळे, शिवसेनेचे जिल्हा संघटक शशिकांतरावजी जाधव, माजी उपनगराध्यक्ष कै. वसंतराव जाधव, कै. किसनराव जाधव, माजी शहरप्रमुख संजय नलावडे, शहाजी गायकवाड,श्री बाळासाहेब पिंगळे, जयसिंग मामा चुंगडे, श्री मारोतीराव दिपाले, श्री. लक्ष्मण दादा ढवळे, राजेंद्र ढवळे, स्व. शिवाजी आबा नवले, बबन जिजा जगताप, स्व. बाळासाहेब शामराव गायकवाड पूनम गल्ली, दत्त सुदामराव गायकवाड, अनिलजी ढेपे, नंदू येवले, संपतराव वरवट, स्व. गोकुळ फरताळे, चेअरमन रामेश्वर कुंभारकर, शिवाजीराव मोरे, सुनीलजी महाकुंडे, स्व. संजय महाकुंडे, आसारामजी गलधर, भाऊसाहेब गलधर, गणेश गरुड, शिवाजीराव नवले पाली, आसारामजी आमटे, येळे बापू, भगवान सेनेचे जिल्हाध्यक्ष मुरलीधरराव ढाकणे, सरसेनापती फुलचंदरावजी कराड, विठ्ठलरावजी दंडे, माजी तालुकाप्रमुख श्री. शिंदे साहेब, माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे, केजचे माजी तालुकाप्रमुख किसनराव कदम, माजी तालुकाप्रमुख श्री. राजाभाऊ जाधव, माजी शहर प्रमुख श्री. संजय शिंदे, केजचे माजी तालुकाप्रमुख किसनराव कदम, माजी तालुकाप्रमुख राजेभाऊ जाधव, माजी शहर प्रमुख श्री. संजय शिंदे, हनुमंतराव नारायनकर पाटोदा, सुशीलभाऊ कोठेकर, माजी तालुकाप्रमुख वैजनाथ दादा येवले, सुभाषरावजी घाडगे, जालिंदररावजी पिसाळ, माजी तालुकाप्रमुख नारायण होंडे साहेब, कै. वैजनाथदादा येवले, सुभाषजी घाडगे, श्री. चाळक साहेब गेवराई, सखारामजी हकदार, माजी जि. प. सदस्य दशरथ दादा वनवे, वैजनाथ मिसाळ, कै. प्रल्हादराव पालवे, सर्जेराव तात्या तांदळे, विकास साळुंके, विश्वनाथराव पोटे, कैलासराव नलावडे सरपंच, पिंटूशेठ पिंगळे, त्रिंबकराव आबदार, बापू सवासे, श्री. शेषेराव आरेकर, श्री. वशिष्ठ नवले जि प सदस्य, बाळासाहेब काळे, सतीशजी महाजन, शिरीषजी महाजन, प्रभाकर जाधव, भारत भाऊ गायकवाड, स्व. भागवतराव पुजारी, अशोकजी तावरे,कृष्णा वांगीकर, स्व. सुमंत रुईकर, बिबीशन चव्हाण, रोहिदास कदम, स्व. शेषराव बहिरवाळ, गणेश बनसोडे, परमेश्वर डोंगर, तात्या शिंदे, बाबा भिंगले, चंद्रसेन उबाळे पाटील, प्रल्हादराव धनगुडे पाटील, श्रीरामजी ढवळे, अशोक भैय्या रोमन, स्व. अशोक मस्कर, श्रीकांतराव अंगदराव पवळ, बाळासाहेब घुमरे पाटील, संजय महाद्वार, रंजीत भाऊ कदम, नगरसेवक रामसिंग टाक, कै. प्रतापराव लाहोट कै. मारुतीराव गायकवाड, मुरलीधरराव राऊत, दामोदरराव राऊत, अनिलजी भागवत, पारसजी ओस्तवाल महिला आघाडी प्रमुख कुसुमताई पवार, श्रीमती शैलेजाताई खडकीकर, शहादेव खांडे, शहादेव बापू घोडके, माऊली खांडे, श्रीधरराव उखांडे पाटील, हनुमानराव जगताप, श्रीराम जगताप, लक्ष्मणराव काटे, श्रीमंतराव उबाळे, अभिमान पडूळे, वसंतराव पडूळे, मिर्झा चौकत बेग, सिराज पठाण, मशरू पठाण, सय्यद सलीम सय्यद अमीर, श्री. शाफेभाई ,शेख मज्जुभाई (माजेद), संभाजीराव भोसले, विजयकुमार धांडे, गोपाळराव धांडे, पोपटराव शिंदे स्व.बाबासाहेब पिंगळे पाटील, मोहनराव पिंगळे पाटील, रवींद्रजी जवेरी साहेब, स्वर्गीय भागवतराव कोठेकर, अर्जुन राव बहिरवाळ, मुक्तारामजी आहेर, भगवानराव आहेर पाटील, दिलीपराव आहेर पाटील, प्रतापराव नवले, श्री. राजेंद्र गुप्ते रामेश्वर चांदणे सर स्व. आत्माराम चांदणे साहेब, भास्कर चांदणे बळी जिजाऊ चव्हाण, माजी नगरसेवक पांडुरंगजी गायकवाड पुनम गल्ली, श्री. प्रतापराव गायकवाड, योगेश गायकवाड, श्री दयानंद गायकवाड, ॲड. सचिन गायकवाड, प्रभाकर उद्धवराव जाधव( पोलिस पाटील), भरत पांडुरंग जाधव (शिवसेना जिल्हा सरचिटणीस), सुनिल आबासाहेब जाधव, कैलास जाधव, (माजी सरपंच) पाटील रामभाऊ जाधव.संतोष कदम परळी येथील श्री. पप्पूजी ठक्कर, नगरसेवक सोहनी, माजी शहरप्रमुख नागनाथ पवार, अतुलजी दुबे सर, माजी नगरसेवक भाऊराव भोईटे, नगरसेवक श्रीरामजी लाखे, अरुण सावंत धारूर कोणत्या राजेंद्र सोनी, मदनलाल परदेशी आंबेजोगाई, उद्धव वाघमारे, बाळासाहेब देशमुख, श्रीरंग जाधव पाटोदा, आप्पासाहेब पोखरकरनागनाथ पवार, अभय कुमार ठक्कर, भाऊराव भोईटे, माजी उपजिल्हाप्रमुख सुरेश टाक, वैजनाथ साळुंखे, माजी तालुकाप्रमुख बाजीराव शिंदे, विठ्ठल दंडे, जगन्नाथ सोळुंके, भोजराज पालीवाल, कै. दिलीप शेठ बद्दर, रवींद्र परदेशी, चन्बसआप्पा गिरवालकर, रमेश भाऊ चोंडे, रमेश रेड्डी, राजेंद्र सोनी नागनाथ पवार इंगळे, स्व. सुभाषजी शेळके खांबा लिंबा, माजी तालुकाप्रमुख सुनीलजी सोनवणे, स्व. दत्ता काशीद. बापू काशीद, स्व. भीमा क्षीरसागर, अशोकराव नवले टेलर, श्रीमंतराव नलावडे, शरद आदिनाथराव नवले, मा. आ. श्री. आदिनाथराव नवले, मा. आ.श्री. राजेंद्रजी जगताप, मा. आ. जनार्दन तुपे, मा.आ. शिरजभाई देशमुख, मोहनराव जगताप, मा.आ. बाजीरावजी जगताप, माजी नगरसेवक कै. सखारामजी काळे, ज्ञानेश्वर मेंडके, विठ्ठल भाऊ लगड, विठ्ठलभाऊ शिंदे, यांचेसह हजारो हजारो कार्यकर्ते आणि बीड मधील धांडे गल्ली, कबाड गल्ली, माळवेस, धोंडीपुरा, पेठ बीड, पूनम गल्ली सह शहरातील आणि ग्रामीण भागातील सर्व तरुणांनी, शेतकऱ्यांनी यामध्ये प्रचंड मेहनत घेऊन घाम गाळून रक्ताचे पाणी करून आंदोलने केलेले आहेत आणि म्हणूनच आज कुठेतरी त्याचे फळ आपल्याला दिसत आहे. बीडला रेल्वे आली याचा आम्हाला मनस्वी आनंद झालेला असून याचे आम्हाला श्रेय नकोच. हा इतिहास सर्वांना ज्ञात आहेच परंतु या आठवणींना उजाळा द्यावासा वाटला म्हणून ही माझी पोस्ट आहे.



ॲड.चंद्रकांत नवले

# सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा-रोहित धुरंधरे

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांत मुसळधार पाऊस झाला आहे. या पावसाचा फटका तब्बल ३० जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना बसला आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर क्षेत्र या पावसाने बाधित झाले आहे. आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही. त्यात शेतातील पीक देखील हातातून गेले आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत जाहीर करण्याची मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे अध्यक्ष रोहित धुरंधरे यांनी केली आहे. या संदर्भात आम्ही शेतकरी राजा सामाजिक समिती मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोमवारी राज्यभरातून निवेदन देखील सादर करणारा असल्याचे रोहित धुरंधरे यांनी सांगितले. महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि इतर जिल्ह्यांत विशेष बीड, हिंगोली, लातूर, सोलापूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, जिल्ह्यात पावसाने शेतकऱ्यांना अधिक झोडपून काढले असल्यामुळे संपूर्ण राज्यात प्रचंड मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे उभे पीक जमीनदोस्त झाले आहे. कुठे तर पशुधन गेले तर कित्तेक शेतकऱ्यांच्या झालेल्या अतोनात नुकसानीमुळे त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. सद्या राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून त्यांना तात्काळ आर्थिक मदत करण्याची गरज आहे. शेतकरी हा अन्नदाता आहे. जगाचा पोशिंदा आहे. या शेतकऱ्याला जर वेळेवर मदत मिळाली नाही तर खरीपासोबत येणारा रब्बी हंगाम देखील धोक्यात येईल. त्यामुळे केवळ निकष आणि पंचानाम्याचा फार्स न लावता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री यांनी तातडीने राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट ''ओला दुष्काळ'' जाहीर करून शेतकऱ्यांना किमान प्रति हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घ्यावा, अशी कळकळीची मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे अध्यक्ष रोहित धुरंधरे यांनी प्रसार माध्यमाद्वारे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना केली आहे.

## पान ६ वरून...

### नारायणगडच्या दसरा मेळाव्यासाठी

दसरा मेळाव्यास येणाऱ्या भाविक भक्तांची समाजाची गैरसोय होऊ नये म्हणून कामाचा शुभारंभ मठाधिपती शिवाजी महाराज, संपादक गंगाधर काळकुटे पाटील, स्वयंसेवक यांच्या उपस्थितीत झाला. नारायणगड संस्थान च्या वतीने मैदान साफ सफाई करणे, रस्ता, पाणी पुरवठा, पार्किंग व्यवस्था बरोबर अल्पोपहाराची सोय होणार असून तब्बल संस्थानच्या वतीने करण्यात येत आहे. वेगवेगळ्या समित्या स्थापन करणे, स्टेज,मंडप उभारण्याची तयारी, पार्किंग व्यवस्था नियोजन, गावागावांत बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे असे आमचे प्रतिनिधी बाळासाहेब घाडगे यांच्याशी बोलताना नारायणगड चे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी सांगितले.

**यावर्षीही उत्सव विजयी दसरा मेळाव्याचा होणार – गंगाधर काळकुटे पाटील**

गरजवंत मराठ्यांचा लढा लढणारे करोडो समाज बांधवांना आपले आई वडील मानणारे संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांनी नारायणगड वर दि.१२ ऑक्टोबर २०२४. रोजी मागील वर्षी चा दसरा मेळावा रेकॉर्ड ब्रेक केल्यामुळे या या दसरा मेळाव्याचे सर्वत्र कौतुक आणि विरोधकांना धडके भरणार होता. पण संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील आणि नारायणगड अठरा पगड जातीधर्मांच्या समाजातील लोकांना घेऊन जाणारं नेतृत्व आहे. यामुळे लाखो समाज बांधव या दसरा मेळाव्याचे साक्षीदार झालेले आहे. नुकतेच झालेल्या मुंबईतील आंदोलकांने हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट अंमलबजावणी कुणबी नोंदनंतर समाजाला फायदा होणारा असून मोठा आनंद आहे. दरम्यान मागील वर्षी वर्षांपासून संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, धाकटी पंढरी नारायणगड, मठाधिपती महंत गुरुवर्य प्रेममुर्ती शिवाजी महाराज दसरा मेळावा चर्चेत राहिलेला विषय आहे. यावर्षीही उत्सव विजयी दसरा मेळाव्याचा आहे तसेच आपली परंपरा यानूसार दसरा मेळाव्याची जय्यत तयारी, जाहिरात प्रसिद्ध मनोज जरांगे पाटील यांचे लाखो चाहते, नारायणगड चे भक्त सेवेकरी मोठ्या उत्साहात करत आहे. यामुळे चांगला दसरा मेळावा होणार आहे. असे संपादक गंगाधर काळकुटे पाटील यांनी सांगितले.

-----------

### एसपी साहेब, पाटोद्यात

निर्माण झाला आहे.गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी नागरिक, सामाजिक संघटना आणि स्थानिक नेते यांच्याकडून एकमुखाने मागणी होत आहे की तालुक्यात गस्त मोठ्या प्रमाणावर वाढवावी.

**मुख्यालयात वास्तव्यास**

राहण्याच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी.गंभीर गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून नागरिकांचा विश्वास परत मिळवावा.पाटोदा तालुक्यातील घटना केवळ वेगळ्या नव्हेत, तर सलग घडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने फक्त आकडेवारी सांगून नागरिकांची बोळवण न करता प्रत्यक्ष कामगिरी दाखवणे गरजेचे आहे. अन्यथा कायदा व सुव्यवस्था ढासळेल आणि सामान्य माणूस असुरक्षिततेच्या विळख्यात अडकून बसेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

-----------

### कंत्राटी कामगारांच्या न्याय

होता, त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत मध्ये कार्यरत असलेल्या सफाई कामगारा सहित इतर कामगारांना आणि वीज कंत्राटी कामगारांना किमान वेतनासहित इतर प्रचलित कामगार कायद्याच्या सोयी सुविधा मिळत नसल्याबाबत रोजंदारी मजदूर सेने तर्फे मागील अनेक वर्षापासून विविध निवेदने देऊन प्रसंगी मागणीच्या अनुषंगाने धरणे, निदर्शने, मोर्चा, जेलभरो, आमरण उपोषण, झाडावर चढून शोले स्टाईल आंदोलने लोकशाही मार्गाने करण्यात आलेली आहेत. एवढा प्रदीर्घ लढा संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली लढून सुद्धा कार्यरत कंत्राटी कामगारांना आजतागायत जिल्हा प्रशासनाने पिडीत कामगारांना त्यांचे मूलभूत हक्क मिळवून दिले नाहीत, या करीता पुन्हा एकदा कंत्राटी कामगारांच्या सर्व प्रलंबित मागण्यांची तात्काळ पूर्तता करण्यासाठी कामगार प्रतिनिधी तथा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी जिल्यातील कंत्राटी कामगार प्रतिनिधी सुद्धा अन्नत्याग उपोषणास बसले आहेत.

-----------

### संदेश पारखे

गेलेल्या मित्रांनी त्याला पुन्हा आष्टी येथे ग्रामीण रुग्णालयांमध्ये शवविच्छेदना करता आणले. त्याच्यावर हनुमंत गाव येथे दुपारी अंत्यसंस्कार संपन्न झाले हनुमंत गावातील एक हरहुन्नरी व अभ्यास वृत्तीचा सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणारा संदेश पारखे यांच्या अचानक जाण्याने पारखे कुटुंबावर व हनुमंत गावकऱ्यांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे अंत्यसंस्काराला मोठा मित्रपरिवार गावातील प्रतिष्ठित मंडळी नातेवाईक व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते आष्टी येथील बाबाजी अकॅडमी मध्ये जवळपास शेकडो तरुण भरतीपूर्व प्रशिक्षण शारीरिक फिटनेस चाचणी घेत आहेत.संदेश पारखे हा विद्यार्थी बाबाजी अकॅडमी मध्ये आज बऱ्याच दिवसानंतर त्याच्या मोठ्या भावासोबत प्रशिक्षण घेण्यासाठी आला होता मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते.

-----------

### आमदार,खासदार

देण्यासाठी या गावातील ग्रामस्थांनी अनेक वेळा निवेदन दिली आंदोलने ही केली मात्र त्याचा काहीही उपयोग झालेला नाही.आमदार, खासदार, मंत्र्यांसह प्रशासनाने जाणून-बुजून या गावातील दलित वस्ती कडे दुर्लक्ष केले आहे का? एवढा महत्त्वाचा प्रश्न असताना देखील लोकप्रतिनिधी व प्रशासन का दुर्लक्ष करतय? हा गावकऱ्यांना पडलेला प्रश्न आहे. सदरील कोठारबन गावातील दलित वस्ती कडे जाणारा या नदीवरील पूल लोकप्रतिनिधी किंवा प्रशासनाने होईल तेवढ्या लवकरात लवकर बांधून द्यावा यासाठी लोकशाही मार्गाने दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता दलित ग्रामस्थ पुरुष महिला वयोवृद्ध व बालक यांच्या समवेत नदीमध्ये उतरून हे आंदोलन करण्यात येणार आहे. याची प्रशासनाने नोंद घ्यावी अशा प्रकारचं निवेदन आज दिनांक २० ९ २०२५ रोजी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात गावातील दलित वस्तीच्या ग्रामस्थांनी म्हटले आहे. कोठारबन येथील दलित वस्तीची पुलासाठी अनेक वर्षांची मागणी आहे परंतु गावकऱ्यांनी व तेथील ग्रामपंचायत सदस्य यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन लोकशाही मार्गाने तो मंजूर करून घेण्यासाठी पुटक करावा असं मला वाटतंय

**वैभव महेंद्रकर, तहसीलदार वडवणी**

वडवणी तालुक्यातील नदीपात्राच्या पुलाचा प्रश्न मी स्वतः बघितलेला आहे अत्यंत कठीण परिस्थिती आहे तेथील लोकांना ये जा करण्यासाठी खूपच मुश्कील आहे आणि यावर तोडगा निघाला पाहिजे लोकशाही मार्गाने पुलाचे काम निकाली निघालं पाहिजे अशा पद्धतीने मी निवेदनकर्त्यांना सांगितलेला आहे आणि मी स्वतः तहसीलदार यांना सुद्धा बोलले आहे.

**वर्षाताई व्हगाडे, सहाय्यक उपनिरीक्षक वडवणी**

-----------

### नुकसानग्रस्त क्षेत्राचे तातडीने

महिंदा' या बँकेचे कर्जवाटप निरंक आहे ही अतिशय गंभीर आहे. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक व सार्वजनिक बँकांनी अनुक्रमे ४३६३० व २८९४७ एवढया खातेदारांना कर्जवाटप केले आहे. एकत्रितरित्या १०९५०१ खातेधारकांना कर्जवाटप किसान क्रेडीट कार्डवर झाल्याचे निदर्शनास येते. जिल्ह्यातील सर्व पात्र खातेधारकांचा विचार करता हे वाटप अत्यंत असमाधानकारक आहे. खरीप हंगाम हाता-तोंडाशी आलेला असताना झालेले नुकसान व असमाधानकारक खरीप कर्जवाटप याचा मोठा फटका जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वसणार आहे. याची नोंद घेऊन इष्टांकपुर्ती न करणाऱ्या बँकाविरूध्द कार्यवाही करावी अशी मागणी देखील डॉ.ज्योती मेटे यांनी केली आहे.

---------

### फसवणुक करून

व्याजाने पैसे घेतले. पैसे परत देण्याच्या बोलीवर सन २०१७-१८ मध्ये आमच्या तुळजाई चौकातील इमारत खरेदीचा व्यवहार झाला आहे. व्याजापोटी देण्यात आलेली रक्कम व्याजासह तात्काळ परत करा, अन्यथा घराबाहेर निघा, असे म्हणून आम्हा पती-पत्नीला भरचौकात वाईट हेतूने ओढाताण करुन मारहाण केली. माझ्या पतीलाही छातीला बुक्क्या मारुन जबर मारहाण केली. सदर प्रकार घरात केल्यानंतर बाहेर आल्यानंतरही चौकातही मारहाण करण्यात आली. या वेळी लहू थोरात म्हणाला, शिवाजी नगर पोलीसांचे आमच्याकडे बाहेर काढण्याचे आदेश आहेत. असे म्हणून मला मारहाण केली. सदर प्रकरणी ढाकणे कुतुबियांनी पोलिसात धाव घेतली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तक्रार देऊनही रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल केला नव्हता. सकाळी १०.३० वाजता मारहाण करून घोळवे आणि त्यांच्या लोकांनी अनधिकृतरीत्या घरात घुसून ढाकणे कुटुंबाला बाहेर काढले. ढाकणे यांच्या घराला कुलूप लावून दंडेली केली आहे.

## पान १ वरून...

### पिकांची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी

कृषी विद्यापीठांचे शेतकऱ्यांशी थेट नाते असल्याचे सांगून, हवामान बदलामुळे अवकाळी पावसाचे प्रमाण आणि इतर संकटे वाढल्याने पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचेही मंत्री भरणे यांनी निदर्शनास आणले. यावर तोडगा काढण्यासाठी शास्त्रशुद्ध उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, पदभरती न झाल्यामुळे कामावर परिणाम झाल्याचे समोर आले. मात्र आता सरकारच्या नव्या निर्णयामुळे ही समस्या सुटेल आणि कृषी शिक्षणात सुधारणा होईल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

---------

### कराडचा राईट हॅण्ड गोट्या

दहिफळे, विलास गिते यांच्यावरील मोक्का हटवण्यात आला आहे. तर, गँगचा मोरक्या रघुनाथ फड आणि धनराज फड यांच्यावरील मोक्का कायम ठेवण्यात आला आहे.

-----

### राज्यात होणार २० नवीन

होते. मात्र, नवीन तालुक्यांच्या निर्मितीला सरकार नेहमीच सकारात्मक होते. तालुका निर्माण करणे तुलनेने कमी खर्चिक असते आणि स्थानिक प्रशासनाला सुलभता येते. आता, २०२५ मध्ये पुन्हा ही चर्चा तापली आहे. मंत्री बावनकुळे यांनी चंद्रपूर येथे सांगितले की, सरकारसमोर २० नवीन जिल्हे आणि ८१ तालुक्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव आला आहे. पण, हा प्रस्ताव फक्त 'कागदावर' आहे. ''जनगणनेचा अहवाल येईपर्यंत निर्णय होणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

---------

### गटशिक्षण अधिकाऱ्याचे

असे पिडितीने तक्रारीत म्हटले आहे. लक्ष्मण बेडसकर याने केलेल्या कृत्याप्रकरणी पिडित विद्यार्थीनीच्या फिर्यादीवरून बेडसकर विरुध्द कलम ७४,७५ (१), ७५ (२), ३५१ (२) बीएनएससह कलम बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ आणि १२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

--------

### एसटी महामंडळात १७ हजार

विस्तार आणि सेवा सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण आहे. या भरतीमुळे राज्यभरातील हजारो तरुण-तरुणींना रोजगाराची सोन्याची संधी मिळेल आणि प्रवाशांना सुरळीत सेवा मिळवता येईल. एसटी महामंडळाच्या ३०० व्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. ही भरती पूर्णपणे कंत्राटी पद्धतीने होईल आणि सुरुवातीला ३ वर्षांसाठी करार केला जाईल. निवड झालेल्या उमेदवारांना एसटीकडून पूर्ण प्रशिक्षण दिले जाईल. यामुळे ते चालक आणि कंडक्टर म्हणून प्रभावीपणे काम करू शकतील. या पदांसाठी महिन्याला कमीतकमी ३० हजार रुपयांचे वेतन मिळेल, यामध्ये इतर लाभही समाविष्ट असतील. सरनाईक यांनी स्पष्ट केले की, ही भरती महामंडळाच्या आर्थिक सक्षमीकरण आणि तांत्रिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी आहे. भविष्यात २५ हजार नवीन बसेस खरेदी करण्याच्या योजनेचा भाग म्हणून, दरवर्षी १ हजारहून अधिक इलेक्ट्रिक बसेस येणार असल्याने मनुष्यबळाची आवश्यकता वाढेल. यामुळे बसेसच्या देखभालीसह प्रवाशांची गैरसोय टाळता येईल.

-----------

### भारताचे पंतप्रधान

लवकर परतण्याचा इशारा दिला. या बदलामुळे कुशल कामगारांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा धक्का बसू शकतो, सुमारे ७० टक्के एच १-बी धारक भारतीय आहेत. या निर्णयाची बातमी शेअर करताना राहुल गांधी यांनी ट्विट केले, 'मी पुन्हा सांगतो, भारताचा पंतप्रधान कमकुवत आहे.' त्यांनी २०१७ मध्ये पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिका भेटीदरम्यान एच-१ बी व्हिसा चिंता चर्चेचा विषय नव्हता तेव्हाची त्यांची अशीच टिप्पणी देखील शेअर केली. लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याशी तुलना केली आणि मागील राजनैतिक वादाच्या वेळी त्यांनी दिलेल्या ठाम प्रतिक्रियेची आठवण करून दिली. ''आता पंतप्रधान मोदींचे धोरणात्मक शांतता आणि मोठ्या आवाजातील प्रकाशयोजना भारताच्या आणि तिच्या नागरिकांच्या राष्ट्रीय हितासाठी एक जबाबदारी बनली आहे,'' असे ते म्हणाले.

-------------

### राज्यातील पाच सहकारी

आदेशानुसार साडेचार लाखांचा दंड ठोठावला. यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला १९५६ च्या बँकिंग नियमन कायद्याच्या सेक्शन २० आणि सेक्शन ५६ संदर्भातील तरतुदींचे पालन न झाल्याने १ लाख रुपयांचा दंड करण्यात आला. मुंबईतील भारत को-ऑपरेटिव्ह बँक मुंबई लिमिटेडला सायबर सुरक्षेसंदर्भातील कारणासाठी ३.७५ लाख रुपयांचा दंड करण्यात आला.

---------

### स्व.यशवंतरावांच्या महाराष्ट्रात नेत्यांची

तर हे नेते आहेत की थिल्लर कार्यकर्ते असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. महाराष्ट्राने यशवंतराव चव्हाण, वसंत दादा पाटील, वसंतराव नाईक, विलासराव देशमुख, शरद पवार, गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे नेते पाहिले, वाचले आणि ऐकले आहेत. पण त्यांच्या बाबतीत कधीही असे दिसून आले नाही. त्यांनी महाराष्ट्राचा आणि राजकारणाचा सुसंस्कृतपणा जपलाच. एक उदाहरण घ्यायचे तर प्रल्हाद केशव अत्रे आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या दरम्यान एक असा प्रसंग घडला की तो आदर्श राजकारणाचा मैल ठरावा. प्रल्हाद केशव अत्रे यांनी एक वेळी बोलण्याच्या ओघात यशवंतराव चव्हाण यांना निपुत्रक म्हटले होते. ही टीका हृदयाला छेद करून जाणारी होती, त्यामुळे त्यांना राग येणे हे स्वाभाविक होते. परंतु चव्हाण यांना राग आला नाही. १९६० मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाल्यानंतर हा प्रसंग घडला होता. त्यावेळी यशवंतरावांनी एक चकार शब्द काढला नाही. उलट निपुत्रक म्हटले म्हणून यशवंतरावांनीच अत्रे याना फोन केला आणि त्याचा खुलासा केला. त्यावेळी ते म्हणाले, माझी पत्नी वेणूबाई १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात असताना तिच्यावर इंग्रजांनी लाठी हल्ला केला आणि त्यात तिचा गर्भपात झाला आणि त्याचवेळी गर्भाशय कायमचे निकामी झाले. हे सांगतानाही वाघाचे काळीज लागते ते यशवंतराव चव्हाण यांच्याकडे होते. तुम्ही माझ्यावर असा आरोप का केला अशी एक शब्दानेही यशवंतराव अत्रे यांना म्हणाले नाहीत. दुसरीकडे यशवंतराव काहीच न बोलल्यामुळे अत्रे हे मनातून खचले, अस्वस्थ झाले आणि यशवंतरावांची माफी मागण्यासाठी ते थेट घरी गेले. अत्यंत भावनिक होऊन त्यांनी वेणूताईंची माफी मागितली. त्यावेळी रेणुताई त्यांना म्हणाल्या, भाऊ या निमित्ताने तरी तुम्ही घरी आलात. हे शब्द ऐकल्यावर अत्रेंच्या डोळ्यातून पाणी आले आणि यशवंतरावांनी मोठ्या मनाने अत्रेंना माफ केले. हा प्रसंग महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतीकता किती प्रगल्भ होती हे दाखवून देतो. महाराष्ट्रातील नेत्यांची त्यावेळी जी प्रतिमा होती त्यामुळेच सुसंस्कृत असा महाराष्ट्र मानला जातो. पण आजकालची नेते मात्र महाराष्ट्राला न पटणारे आरोप करीत आहेत. ते थिल्लर कार्यकर्त्यासारखे शब्द वापरतात. मंत्री राणे यांचे उदाहरण घ्या, इकडे मराठा आरक्षणाचे आंदोलन मनोज जरांगे, ओबीसी नेते लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे यांनी तर आरोपाची सीमा ओलांडली. आता त्यात भाजपा आमदार गोपीचंद पडळकर यांची भर पडली त्यांनी तर थेट जयंत पाटलावर आरोप करताना त्यांच्या वडिलांचे नाव घेऊन आवलाद नसल्याचा आरोप केला. गेल्या अनेक वर्षापासून जयंत पाटील आणि पडळकर यांचे फारसे जमत नाही. ते २००९ च्या विधानसभा निवडणुकीपासून. त्यावेळी राष्ट्रवादीकडे खानापूर विधानसभेची जागा होती ती काँग्रेसला सुटल्याने राष्ट्रवादीत असलेले अनिल बाबर अपक्ष उभे राहिले तेव्हा आबा पाटील, जयंत पाटील यांनी अनेक अपक्षांचा पाठिंबा अनिल बाबर यांना मिळवून दिला होता. मात्र त्यावेळी गोपीचंद पडळकर हे रासपाकडून उभे राहिले होते त्यांना जवळपास ९९ हजार मध्ये मिळाली आणि यामुळेच काँग्रेसकडून उभे असलेले अनिल पावर यांचा दोन हजाराच्या मतांनी पराभव झाला. आपला उमेदवार पडल्याचा राग पाटलाच्या मनात होता त्यातूनच त्यांनी गृहमंत्री असताना गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल केला असल्याची चर्चा आहे, परंतु राजकारण करत असताना आपण कशा पद्धतीने आरोप केले पाहिजेत, विरोधकावर कसे बोलले पाहिजे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्र के अत्रे आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यात घडलेला प्रसंग आहे. आजही भाषणामध्ये यशवंतराव वसंत दादा यांचा वारसा सांगणारे अनेक जण आहेत परंतु त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारे मात्र कमी दिसतात. महाराष्ट्रातील या नेत्यांचा स्तर आणि राजकारणाची स्थिती ढासळली आहे हे मात्र निश्चित. संस्कृत असणारा हा महाराष्ट्र आता यशवंतरावांच्या विचाराच्या बाजूला गेला की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. यावर आता सर्वच पक्षाच्या नेत्यांना चिंतन आत्मचिंतन करण्याची मोठी गरज आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २१ सप्टेंबर २०२५






बीड : विजय पालसिंगनकर कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा शाल श्रीफळ देऊन सत्कार करताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील मिराताई गांधले जयश्री मुंडे संध्या राजपूत बालाजी पवार सौ कुलकर्णी ताई परजने पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात...



### राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती येवलवाडीत मोठ्या उत्साहात साजरी

पाटोदा प्रतिनिधी

येवलवाडी गावात राष्ट्रसंत संत भगवान बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी मिरवणुकीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गावातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत भगवान बाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

गावातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व मान्यवरांनी संत भगवान बाबांच्या कार्याचा आढावा घेतला व त्यांच्या शिकवणीचे स्मरण करून समाजात बंधुता, प्रेम व एकात्मतेचा संदेश दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुण मंडळ व महिला वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. भक्तीमय वातावरणात येवलवाडी करानी राष्ट्रीय संत भगवान बाबा जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

### नानासाहेब आजबे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिराळ येथील सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब गंगाधर आजबे (वय ३८) यांचे अल्पशा आजाराने पुण्यातील नोबेल हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना दुःखद निधन झाले. नानासाहेब आजबे हे शिराळ व परिसरात विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय होते. दुष्काळाच्या काळात गावातील शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी त्यांनी छावणी चालवून मोठे योगदान दिले होते. तसेच शैक्षणिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्येही ते नेहमी पुढाकार घेत. गरजू विद्यार्थ्यांना



मदत करणे, सामाजिक ऐक्य जपणे आणि सर्वसामान्यांसाठी सदैव तत्पर राहणे ही त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाची वार्ता कळताच शिराळसह संपूर्ण तालुक्यात शोककळा पसरली आहे. अंत्यसंस्कार शुक्रवारी दुपारी एक वाजता धीर्डी येथे पार पडले. या वेळी राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. नानासाहेब आजबे यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने तालुक्यातील सामाजिक कार्याची मोठी हानी झाली असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### पेन्शनरचे प्रलंबित प्रकरणी जितीन रहमान यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष शेख वजीर राज्य सरचिटणीस डी.एम .राऊत राज्य कार्याध्यक्ष रामहारी घुले राज्य उपाध्यक्ष शहाजीराव कदम राज्य कोषाध्यक्ष ओंकार बडसल राज्य मार्गदर्शक बाबुराव उबाळे संघटनेचे राज्य सदस्य गोविंद रसाळ,शाम मार्कंडे , प्रविण बुंदेले ईत्यादी च्या वतीने जितीन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना संघटनेच्या जि.प.पेन्शनरच्या विविध प्रलंबीत मागण्या बाबत सविस्तर चर्चा करुन प्रलंबीत प्रकरणे लवकर निकाली काढणेसाठी निवेदन देण्यात आले.यावर मुख्य कार्यकारी जितीन रहमान यांनी विभागाशी चर्चा करुन सर्व प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्याची नियमाप्रमाणे कार्यवाही करणेत येईल असे आश्वासन देण्यात आले.

# नुकसान भरपाईची रक्कम दुप्पट करावी-माजी आ.धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने शेतकऱ्यांनीचे अतोनात नुकसान झाले आहे. नागरीकांचे घरे पाण्याखाली गेली.जनावरे दगावली,२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. व्यावसायिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. जमिनी वाहुन गेल्या आहेत. तात्काळ पंचनामे करून तातडीची मदत द्या.या पावसाने अतोनात नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाईत दुप्पट वाढ करावी असे निवेदन माजी आ.भीमराव धोंडे यांनी दिले. आष्टीच्या तहसिलदार वैशाली पाटील यांना लेखी निवेदन देऊन आष्टी तालुक्यातील नुकसानीची माहिती दिली. नुकसानीचा मिळणारा मावेजा दुप्पट करण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.विविध नुकसान ग्रस्तांना सोबत घेऊन तातडीने प्रश्न सोडवा अशा सुचना देखील धोंडे यांनी दिल्या





आहेत.शुक्रवारी माजी आ.भीमराव धोंडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे विविध प्रश्न घेऊन तहसिलदार वैशाली पाटील यांची भेट घेतली.तातडीने त्यांचे प्रश्न सोडविण्यास सांगितले.यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद आहे की,आष्टी तालुक्यातील सर्व मंडळामध्ये अतीवृष्टी झाली आहे.त्यामध्ये दौलावडगाव, दादेगाव,धानोरा, कडा,धामणगांव, डोईठाण व पिंपळा या मंडळामध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी पूराच्या पाण्यामुळे खरडून गेलेल्या आहेत. अनेक विहीरी व बोरवेल बूजून गेलेले आहेत.जीवीत हानी व घरांचे दुकानांचे तसेच शेतातील पिकांचे व फळबागांचे आतोनात नुकसान झाले असून त्या ठिकाणी तात्काळ पंचनामे करून खासबाब म्हणून शासनामार्फत मिळणाऱ्या तातडीच्या तात्काळ आर्थिक मदतनिधी मध्ये पुरस्थिती पाहता दुपटीने वाढ करण्याबाबत वरिष्ठास कळवून तात्काळ अन्यधान्य, आर्थिक मदत व अत्यावश्यक ती मदत देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे. यावेळी नियामत बेग,अड रत्नदिप निकाळजे, रिपाइं तालुकाध्यक्ष अशोक साळवे, सतीषमामा झगडे, शिवाजी सुर्यवंशी, चंद्रशेखर साके, बाळासाहेब शेकडे, सरपंच संभाजी झांबरे,सरपंच दादासाहेब जगताप, रघुनाथ शिंदे,माजी सरपंच संजय नालकोल, सरपंच ज्ञानेश्वर वाघ, सरपंच भाऊसाहेब कोकरे,सरपंच अभय गर्जे,अस्ताक शेख,राजदीप निकाळजे,आदेश निमोणकर,युवराज खटके,सदाभाऊ दिंडे,बाबा ससाणे, मच्छिंद्र सदाफुले आदी कार्यकर्ते, नागरीक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रीडांगण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे उत्तम साधन- क्रीडा अधिकारी सतिष राठोड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कुठलेही क्रीडांगण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे उत्तम साधन असल्याचे मत तालुका क्रीडा अधिकारी सतिष राठोड यांनी व्यक्त केले . ते मोदी लर्निंग सेंटर येथील न्यू व्हिजन पब्लिक स्कूल, अंबाजोगाई येथे तालुकास्तरीय कब्बडी स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी बोलत होते. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला होता. नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत परिसरातील विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांनी आपल्या कुस्ती कौशल्याचा उत्तम प्रत्यय या स्पर्धेत दाखवून दिला.

स्पर्धेचे उद्घाटन अंबाजोगाई तालुका क्रीडा अधिकारी सतीश



राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की क्रीडांगण हे व्यक्तिमत्व घडवण्याचे उत्तम साधन आहे. क्रीडांगण हे शाळेपेक्षा कमी महत्त्वाचे नसल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर परिश्रम, शिस्त आणि चिकाटी यामुळेच खरी क्रीडावृत्ती विकसित होत असून विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांकडे अतिशय गांभीर्याने पाहिले पाहिजे असा मौलिक सल्लाही विद्यार्थ्यांना सतिष राठोड यांनी दिला. या स्पर्धेत न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम कामगिरी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शालेय पातळीवर सातत्याने सराव करणाऱ्या शृष्टी नितिन पाटील , श्रावणी केंद्रे , प्रितम फड आणि काव्या देशमुख या चार विद्यार्थिनींनी आपले क्रीडा कौशल्य दाखवत जिल्हास्तरीय निवड स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.

## सरसकट अतिवृष्टी नुकसान भरपाई द्या -कवडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील सर्व मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे त्यामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने मदत करावी या मागणीचे निवेदन शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले.**

१) शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्या. २)शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे. ३)कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान द्या.

४)एक वर्षापासून सौर पंपाचे पैसे भरून घेतले ते तात्काळ बसून द्या. ५)ई पिक पाहणी सरोवर चालत नसून तलाठ्याला इ पिक पाहणी करण्याचे आदेशित करावे.या प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करून उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्याकडे



तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले मागण्या मान्य न झाल्यास शेतकऱ्याचे तालुक्यांमध्ये खूप मोठे आंदोलन उभा करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शिवभूषण जाधव, सय्यद साजेद भाई, राजाभाऊ राऊत, बापूराव भवर, पत्रकार कादरभाई मकरांनी, भाऊसाहेब सानप, भरत भाकरे,देविदास काळे, संजय जाधव, ज्ञानेश्वर नाईकनवरे, नवनाथ जाधव, संतोष घाडगे, परमेश्वर राऊत, विठ्ठल राऊत, अरुण गाडेकर, भीमा गाडेकर, मदन बाप्पा घुमरे, बाबासाहेब घुमरे, हनु सानप, काकासाहेब घुमरे, राजूअण्णा भोसले, दीपक भोसले, ऋषी घुमरे, विठ्ठल गाडेकर, अंकुश भाऊ गुंड, भीमराव घोलप, रामभाऊ बामदळे, बापूराव ढेरे, अश्रू ढेरे, नवनाथ राव जावळे शेकडो शेतकरी उपस्थित होते. वेळ आलेल्या सर्व शेतकऱ्यांचे आभार गणेश कवडे यांनी मानले.

## आदर्श पत्रकारितेचे विद्यापीठ म्हणजे अनंत भालेराव -माजी आमदार डी.के.देशमुख

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन ''दै.मराठवाडा''च्या माध्यमातून मूल्याधिष्ठित पत्रकारितेचा मापदंड निर्माण करणारे संपादक अनंत भालेराव हे आदर्श पत्रकारितेचे चालते-बोलते विद्यापीठ होते असे प्रतिपादन नवविकास मंडळ शिक्षण संस्थेचे कार्यवाह तथा माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख यांनी केले.

नवविकास मंडळ शिक्षण संस्थेच्या नूतनीकरण केलेल्या अद्ययावत व सुसज्ज अनंत भालेराव सभागृहाच्या उद्धाटन समारंभा प्रसंगी माजीआमदार डी.के.देशमुख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा होते तर उपाध्यक्ष ॲड. आर.डी.



भिलेगावकर,संचालक संपादक शिरीष देशमुख,संचालक डॉ.सचिन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री.देशमुख म्हणाले की,भालेराव यांनी स्वातंत्र्याआधी बंदूक आणि स्वातंत्र्यानंतर लेखणी घेऊन वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकशाहीची मूल्ये टिकवण्याचे काम केले.भालेराव यांच्या नावाने असणारे हे सुसज्ज सभागृह येणाऱ्या अनेक पिढ्यांना त्यांच्या कार्याचे स्मरण करून देणारे ठरेल.याप्रसंगी ॲड.शर्मा यांनी अध्यक्षीय समारोपात भालेराव यांच्या लोकाभिमुख कार्याचा गौरव केला.प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिक्षक दिनानिमित्त संस्थेतील सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना खादीचा रूमाल आणि गुलाबपुष्प देऊन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.याप्रसंगी माजी आमदार डी.के.देशमुख यांच्या ८४ व्या वाढदिवसा निमित्ताने नवविकास मंडळ परिवाराच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते यांनी प्रास्ताविक केले,पर्यवेक्षक एम.एन.मसलेकर यांनी मनोगत व्यक्त केले तर पर्यवेक्षक एस.एस.देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे गीत व पसायदान योगिता मोडक यांनी सादर केले तर सूत्रसंचालन हिमांशू देशमुख यांनी केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक के.एल.मोताळे, जे.पी.कुलकर्णी,अंजली शिंदे यांच्यासह सर्व संस्कार केंद्रातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोतन येथे कोतुआई नवरात्र उत्सवानिमित्त महिला हरिनाम सप्ताह सोहळा

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कोतन येथे प्रथमच यावर्षी आई जगदंबा कोतुआई नवरात्र उत्सवानिमित्त ह.भ.प.गुरुवर्य महंत महादेवानंद भारती महाराज (श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थान,पिंपळवंडी) यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२२/०९/२०२५ ते दि.३०/०९/२०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन केले असून या सप्ताह कालावधीमध्ये कल्याण स्वामी वारकरी शिक्षण संस्थेतील १०१ मुली,गायनाचार्य, मृदंगचार्य,हार्मोनियम,वादक, टाळकरी,हरिपाठ,किर्तनकार व प्रवचनकार ९ दिवस महिला व मुली कार्यक्रमाचे नियोजन करणार आहेत. या सुंदर कार्यक्रमाला पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा.असे आवाहन समस्त गावकरी कोतन, गांधणवाडी,पांढरवाडी,सकुंडवाडी, उंडेवाडी,दौलतवाडी,बेदरवाडी, महादेवनगर,राळेगाव,गुंडेगाव,केडगाव यांनी केले आहे.



या सप्ताह सोहळ्याचा सांगता समारंभ मंगळवार दि.३०/०९/२०२५ रोजी १० ते १२ या वेळेत साध्वी ह.भ.प.सोनालीताई करपे,कल्याण स्वामी संस्थान चकलंबा यांच्या अमृततुल्य काल्याचे किर्तन होऊन नंतर महाप्रसादाने होणार आहे.पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ८ विष्णू सहस्त्रनाम,८ ते १० नाष्टा,१० ते १२ गाथाभजन,१२ ते २ भोजन,२ ते ३ देवीग्रंथ पारायण,३ ते ४ प्रवचन,४ ते ६ हरिपाठ,सायंकाळी ७ ते ९ हरिकिर्तन,रात्री ९ ते १० भोजन,१० ते १२ विविध ठिकाणच्या आराधी मंडळाचे आराधी गाणी,१२ ते पहाटे ४ हरीजागर असे दैनंदिन कार्यक्रम होतील.

सोमवार दि.२२/०९/२०२५ ह.भ.प. संगीताताई सोळसकर (पांचाळ) जाटनांदुर यांचेच प्रवचन व सायंकाळी किर्तन,मंगळवार दि.२३ ह.भ.प. आशाताई भास्कर पोकळे अंमळनेर यांचे प्रवचन व ह.भ.प.ज्ञानेश्वरीताई जगताप बोधेगाव यांचे किर्तन,बुधवार दि.२४ ह.भ.प.उर्मिलाताई वनारसे यांचे प्रवचन व ह.भ.प.सीताताई आव्हाड नागझरी यांचे किर्तन,गुरुवार दि.२५ ह.भ.प.पल्लवीताई सापते गांधणवाडी यांचे प्रवचन व ह.भ.प. ज्ञानेश्वरी ताई बागुल नाशिक यांचे किर्तन,शुक्रवार दि.२६ ह.भ.प. योगिताताई माळवदे (सिन्नर) कल्याण स्वामी संस्थांन चकलंबा यांचेच प्रवचन व किर्तन,शनिवार दि.२७ ह.भ.प.अपेक्षाताई पवार (वासिम) कल्याण स्वामी संस्थांन चकलंबा यांचेच प्रवचन व किर्तन,रविवार दि.२८ ह.भ.प.साक्षीताई राऊत हातोला यांचे प्रवचन व ह.भ.प. सायलीताई राऊत (शेवगाव)कल्याण स्वामी संस्थान चकलांबा यांचे किर्तन, सोमवार दि.२९ ह.भ.प.प्रतीक्षाताई भवर कोतन यांचे प्रवचन व ह.भ.प. भक्तीताई भगत (नाशिक) कल्याण स्वामी संस्थान चकलंबा यांचे किर्तन, मंगळवार दि.३०/०९/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत साध्वी ह.भ.प.सोनाली ताई करपे यांची काल्याची किर्तन सेवा होणार आहे.

## एस.टी. आरक्षणाची तात्काळ अंमलबजावणी करा सकल धनगर समाजाची तहसील समोर निदर्शने

**माजलगाव । प्रतिनिधी**

**सरकारने धनगर जमातीला सन २०१४ साली बारामती याठिकाणी दिलेला शब्द पाळून धनगर जमातीच्या घटनादत्त एस टी आरक्षणाची तात्काळ अमलबजावणी करावी आणि जालना येथे दिपक बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण तात्काळ सोडवावे या मागणीसाठी शनिवार दि.२० रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव तहसीलसमोर सकल धनगर समाजाच्या वतीने निदर्शने करण्यात आली.यावेळी संघटनेच्या वतीने तहसीलदारांना निवेदन दिले.**

गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाज एसटीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याची मागणी सरकारकडे करत आहे. परंतु सरकार अनेक




वर्षापासून धनगर समाजाच्या तोंडास पाणी पुसण्याचे काम करत आहे.धनगर समाजास निवडणुका दरम्यान फक्त भूलथापा दिल्या जात आहेत.धनगर समाजास पोषक असणारी एसटी आरक्षण अंमलबजावणी झाल्यास धनगर समाजाच्या अनेक प्रश्न सुटण्यास गती येणार आहे.त्यामुळे सरकारने या अंलबजावणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा.असे न झाल्यास सरकार विरोधात धनगर समाजास रस्त्यावर उतरावे लागेल. व लोकशाही मार्गाने हा लढा तीव्र करावा लागेल.याची सरकारने दखल घ्यावी असा इशारा देत निवेदनकर्त्यांनी सरकारविरोधी आपल्या भावना व्यक्त केल्या.यावेळी मागण्यांचे निवेदन तहसीलदार संतोष रुईकर यांना देण्यात आले.दरम्यान समाज बांधवांची यावेळी मोठी उपस्थिती होती.

## अ.सोळंके यांच्या उपस्थितीत लोकाभिमुख आढावा बैठक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे दिनांक २२ सप्टेंबर सोमवार रोजी सकाळी ११:३० वाजता आमदार प्रकाश सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक (कार्यशाळा) आयोजित करण्यात आली आहे.




या बैठकीत जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा होणार आहे.यामध्ये नकाशावरील ग्रामीण भागातील सर्व प्रकारच्या रस्त्यांच्या हद्द खुणा निश्चित करून रस्ते खुले करणे,गावठाण हद्दीतील अतिक्रमण नियमानुसार करून पात्र घरकुल धारकांना जागा उपलब्ध करून देणे,कुणबी प्रमाणपत्र वाटपाबाबत चर्चा,सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा (शेत पिके,वैयक्तिक व सार्वजनिक मालमत्ता) आढावा घेण्यात येणार आहेया बैठकीस माजी जि.प.सभापती जयसिंग सोळंके,उपविभागीय अधिकारी माजलगाव,तसेच माजलगाव धारुर,व वडवणीचे तहसीलदार, गटविकास अधिकारी,कृषी अधिकारी,तलाठी, ग्रामसेवक माजलगाव,धारुर, वडवणी,उपस्थिती असणार आहेत.तरी या बैठकीस माजलगाव,धारुर, वडवणी तालुक्यातील सर्व पदाधिकारी, सरपंच,कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## अंमळनेरमध्ये हिंदू-मुस्लिम एकात्मतेचे दर्शन

### सय्यद बादशहाच्या दर्गा परिसरातील सौर ऊर्जेच्या पॅनलने केली विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण दूर

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील अमळनेर येथील हिंदू मुस्लिम श्रद्धास्थान असलेले सय्यद बादशहाच्या ठिकाणी असलेल्या सौर ऊर्जेचे पॅनल अमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या शाळेस मुस्लिम समाजाच्या वतीने सप्रेम भेट देण्यात आल्याने अंमळनेर मध्ये हिंदू मुस्लिम गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.अमळनेर मध्ये हिंदू मुस्लिमांचे श्रद्धास्थान असलेले सय्यद बादशहांचे दर्गा आहे या ठिकाणी सकाळी हिंदू मुस्लिम नागरिक दर्शनासाठी येत असतात याच ठिकाणी लाईटचे सौर ऊर्जेचे पॅनल बंद अवस्थेत होते.अंमळनेर मध्ये सय्यद बादशहाच्या ठिकाणी असलेले सौर ऊर्जेचे पॅनल बंद अवस्थेत असल्यामुळे ते आणखी खराब होण्याची शक्यता होती ही बाब मुस्लिम बांधवांच्या लक्षात येताच त्यांनी सर्वांशी विचारविनिमय करून ते सौर ऊर्जेचे पॅनल रयत शिक्षण संस्थेच्या शाळेस देण्याचा एकमुखी निर्णय घेतला होता. सय्यद



बादशहांच्या दर्गाच्या आवारात असलेले सौर ऊर्जेचे पॅनल मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत सप्रेम भेट देण्यात आले यावेळी अमळनेर मधील हिंदू मुस्लिम नागरिक हजर होते. रयत शाळेस सौर ऊर्जेचे पॅनल उपलब्ध झालेले असल्यामुळे शाळेतील विद्युत उपकरणे चालवण्यास सोयीस्कर होऊन विद्यार्थ्यांना त्याचा शैक्षणिक फायदा होणार आहे. अमळनेर मध्ये सय्यद बादशहाच्या दर्गा परिसरात असलेले लाखो रुपये किमतीचे लाईटचे सौर ऊर्जा चे पॅनल रयत शिक्षण संस्थेच्या शाळेस देऊन मुस्लिम बांधवांनी हिंदू मुस्लिम एकात्मिकेचे दर्शन दिले आहे.

# जमिनीचा हक्क नसलेल्या शेतकऱ्यांनाही मिळणार पीएम किसान योजनेचा लाभ, लवकरच मिळणार हप्ता

दिल्ली : पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेबाबत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे जमिनीचा मालकी हक्क नाही, पण ते शेती करत आहेत; अशा शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या पडताळणी अहवालाच्या आधारे या योजनेचा लाभ दिला जाईल, असे चौहान यांनी सांगितले.भारताच्या सीमेवरील गावांतील ज्यांच्याकडे जमिनीचा मालकी हक्क नाही, अशा शेतकऱ्यांना राज्य सरकारने प्रमाणित केल्यानंतर पीएम किसान योजनेचा लाभ मिळेल. सीमा भागातील शेतकऱ्यांची ही गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी होती, ती आता पूर्ण होईल, असेही ते म्हणाले. या योजनेचा एक हप्ता तत्काळ जारी केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. चौहान यांनी जम्मू आणि काश्मीरच्या पूरग्रस्त भागांचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी हे आश्वासन दिले. तसेच मनरेगा अंतर्गत सध्याच्या १०० कामाच्या दिवसांवरुन ते १५० दिवस करण्याबाबत ते राज्य सरकारशी चर्चा करतील, असे आश्वासन त्यांनी शेतकरी आणि मजुरांना दिले. पुरामुळे अनेक



घरे उद्ध्वस्त झाली आहेत. या घरांसाठी पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत १ लाख ३० हजार रुपयांची मदत तसेच शौचालयांच्या बांधकामासाठी वेगळी रक्कम आणि ग्रामीण विकास मंत्रालयाकडून मनरेगाची मजुरी म्हणून ४० हजार रुपये दिले जातील, असेही त्यांनी नमूद केले. ''आम्हाला ५,१०१ घरांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्यासाठी तत्काळ मदत मंजूर केली जाईल,'' असे चौहान म्हणाले.

पीएम किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता २ ऑगस्ट २०२५ रोजी जारी केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतून ९.७१ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २०,५०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम थेट हस्तांतरित केली होती. आता शेतकऱ्यांना २१ व्या हप्त्याची प्रतीक्षा लागली आहे. २०२४ मध्ये ५ ऑक्टोबर, २०२३ मध्ये १५ नोव्हेंबर आणि २०२२ मध्ये १७ ऑक्टोबर रोजी पीएम किसान योजनेचा हप्ता जारी केला होता. यावेळी सरकारकडून दिवाळीपूर्वी २१ वा हप्ता जारी शकते, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पण याबाबत अद्याप अधिकृत काही सांगण्यात आलेले नाही. पीएम किसान योजनेनुसार प्रत्येक शेतकऱ्याला दरवर्षी तीन समान हप्त्यांमध्ये ६ हजार रुपये दिले जातात. आतापर्यंत या योजनेचे २० हप्ते जारी करण्यात आले आहेत.




## महत्वाच्या घटना

१८९३ : न्यूझीलंडमधे महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.
१९५२ : विनोदी कलाकार चार्ली चैप्लिन यांना अमेरिकेत येण्यास मनाई करण्यात आली होती. त्यांच्या विरुद्ध देश विरोधी भावनाला प्रोत्साहन देण्याचा आरोप लावण्यात आला.
१९४६ : फ्रान्समधील कान्स येथे पहिला आंतरराष्ट्रीय चित्रपट समारोह झाला. दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे याला ७ वर्षे ऊशीर झाला.
१९५७ : अमेरिकेने पहिल्यांदा भूमिगत अणुबॉम्बचाचणी केली.
१९५९ : सुरक्षिततेच्या कारणास्तव रशियाचे अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांना अमेरिकेतील 'डिस्नेलँड'ला भेट देण्यास मनाई करण्यात आली.
१९८३ : सेंट किटस आणि नेव्हिसला स्वातंत्र्य मिळाले.
१९८५ : मेक्सिको देशांत झालेल्या विनाशकारी भूकंपामुळे सुमारे दहा हजार लोक मृत्युमुखी पडले होते.
२००० : भारताच्या करनाम मल्लेश्वरीने सिडनी ऑलिम्पिक स्पर्धेत वेटलिफ्टिंगमध्ये ६९ किलो वजन गटात ब्रॉन्झ पदक पटकावले आणि ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणारी पहिली भारतीय महिला बनली.
२००१ : महात्मा गांधींच्या मूल्यांचा ब्रिटनमध्ये प्रसार करणारे कार्यकर्ते व विचारवंत डॉ. सतीशकुमार यांना 'जमनालाल बजाज पुरस्कार' जाहीर
२००७ : टी २० क्रिकेट सामन्यातील एका षटकात सहा षटकार मारणारा युवराजसिंग हा पहिला खेळाडू बनला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५१ : हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २ ऑगस्ट १५८९)
१८६७ : शतायुषी पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर चित्रकार, संस्कृतपंडित, वेदांचे अभ्यासक-संशोधक विद्वान व लेखक. चारही वेदांच्या शुद्ध संहिता, समग्र सार्थ महाभारत, सार्थ अथर्ववेद इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. ते हिन्दी, मराठी, गुजराती भाषांत प्रसिद्ध झाले. यांपैकी काही ग्रंथांचे अनुवाद ऊर्दू, कानडी, सिंधी, तेलगू व इंग्रजीमध्येही झाले. (मृत्यू: ३१ जुलै १९६८)
१९११ : विल्यम गोल्डिंग नोबेल पारितोषिकविजेते इंग्लिश लेखक (मृत्यू: १९ जून १९९३)
१९१२ : भारतीय पशुवैद्य आणि प्राणीसंग्रहालय संस्थापक रुबेन डेव्हीड यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९८९)
१९१७ : अनंतराव कुलकर्णी महाराष्ट्रातील पुणे येथे झालेल्या पहिल्या मराठी प्रकाशक संमेलनाचे अध्यक्ष, उत्तम साहित्यिक प्रकाशक व कॉन्टिनेन्टल प्रकाशन संस्थेचे संस्थापक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९९८)
१९२५ : बाबूराव गोखले नाटककार व भावगीतकार (मृत्यू: २८ जुलै १९८१)
१९२७ : ज्ञानपीठ पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्याचे कवी कुँवर नारायण यांचा जन्मदिन.
१९५८ : लकी अली गायक, अभिनेता व गीतलेखक
१९६५ : भारतीय-अमेरिकन अंतराळवीर सुनिता विल्यम यांचा क्लीव्हलँड ओहायो अमेरिका येथे जन्म.
१९७७ : भारतीय क्रिकेटपटू आकाश चोप्रा यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१० : डॅनिश खगोलशास्त्रज्ञ ओले रोमर यांचे निधन.
१७२६ : खंडो बल्लाळ चिटणीस छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम यांचे स्वीय सहाय्यक (जन्म:)
१८८१ : जेम्स गारफील्ड अमेरिकेचे २० वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १९ नोव्हेंबर १८३१)
१९२५ : इंग्लिश वनस्पती वैज्ञानिक सर फ्रान्सिस डार्विन यांचे निधन.
१९३६ : पं. विष्णू नारायण भातखंडे संगीतशास्त्रकार, हिन्दुस्थानी संगीताचे प्रसारक, संशोधक व गांधर्व महाविद्यालयाचे एक संस्थापक (जन्म: १० ऑगस्ट १८६०)
१९६३ : सर डेविड लो जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार (जन्म: ७ एप्रिल १८९१ ड्युनेडिन, न्यूझीलंड)
१९८७ : नॉर्वे देशाचे पहिले पंतप्रधान एनर गेरहर्डसन यांचे निधन. (जन्म: १० मे १८९७)
१९९२ : ना. रा. तथा अण्णासाहेब शेंडे साहित्यिक, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष (जन्म:)
१९९३ : दिनशा के. मेहता निसर्गोपचार तज्ञ, महात्मा गांधींचे आरोग्य सल्लागार व निकटचे सहकारी (जन्म:)
२००२ : प्रिया तेंडुलकर रंगभूमी, चित्रपट व दूरचित्रवाणीवरील अभिनेत्री, लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या. 'जन्मलेल्या प्रत्येकासाठी' या त्यांच्या कथासंग्रहाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला होता. (जन्म: १९ आक्टोबर १९५४)
२००४ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (जन्म: ५ सप्टेंबर १९२८)
२००७ : दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर ऊर्फ 'डी. डी' संगीतकार (जन्म: १५ नोव्हेंबर १९१७)
२०१४ : उप्पलपु श्रीनिवास (वय ४५) भारतीय सारंगी वादक
२०१८ : विष्णु खरे (वय ८६)भारतीय कवी आणि लेखक

## 'सीताफळाच्या' अधिक उत्पादन देणाऱ्या टॉप तीन जाती!



सीताफळ हे उष्णकटिबंधातील सर्वांच्या आवडीचे फळ आहे. बाजारात जुलै ते ऑगस्टमध्ये येणाऱ्या या फळांचा मुख्य हंगाम ऑक्टोबर ते डिसेंबरपर्यंत चालतो. या फळाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या टॉप तीन जातींबद्दल माहिती जाणून घेऊ. सीताफळाच्या प्रामुख्याने ४० ते ५० प्रजाती असून १२० जाती आहेत परंतु लागवडीसाठी ॲनोना स्क्वॅमोसा या प्रकारातील जाती उपलब्ध आहेत.

फुले पुरंदर :ही जात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी २०१४ मध्ये महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस केली आहे. या जातीची फळे आकर्षक व आकाराने मोठे असून वजन ३६० ते ३८८ ग्रॅम आहे. झाडावरील फळांची संख्या ११८ ते १५४ एवढी आहे. फळातील गर घट्ट, रवाळ आणि स्वादिष्ट असून गराचे प्रमाण ४५ ते ४८% आहे. फळातील विद्राव्य घटकांचे प्रमाण २२ ते २४ टक्के आहे एवढे असते. या जातीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गरातील पाकळ्या पांढर्या शुभ्र आणि संख्येने अधिक असल्याने या जातीच्या फळांना गरासाठी मागणी आहे. फळातील बियांची संख्या ३७ ते ४० एवढी आहे. अशा विविध गुणधर्मामुळे सध्या या जातीची लागवड महाराष्ट्रात वाढत आहे.

बाळानगर :ही जात आंध्र प्रदेशातील संशोधन केंद्र येथे विकसित केलेली असून फळांचे सरासरी वजन २६६ ग्रॅम व गराचे प्रमाण ४८% आहे. प्रत्येक झाडापासून ४० ते ६० फळे मिळतात. फळातील विद्राव्य घटकांचे प्रमाण २७ टक्के असून बियांचे प्रमाण ३.९५% आहे. अर्का सहन :ही संकरित जात भारतीय बागवानी संस्था बंगलोर, कर्नाटक येथून विकसित केलेली आहे. फळे व आकर्षक गोल, रंग फिकट हिरवा, डोळे पसरट चपटे असतात. फळाचे वजन ४०० ते ५०० ग्रॅम, गराचे प्रमाण ४८% आणि विद्राव्य घटकांचे प्रमाण ३१ टक्के असल्याने खाण्यास फारच गोड असतात. बियांची संख्या फारच कमी असून लहान असतात. फळांच्या दोन डोळ्यांमध्ये अंतर कमी असल्याने पिठ्या ढेकूण या किडीचा प्रादुर्भाव कमी आढळतो. फळे अधिक काळ टिकतात.

## फळझाडांना संतुलीत खते दिल्यास उत्पादनात वाढ

फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे. यापैकी खत व्यवस्थापनास अन्यन साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे. फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्नद्रव्यांवर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते. त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात. झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त, खतांचा संतुलित पुरवठा, सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन म्हणून वापर,आच्छादनाची पिके, आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चांगली ठेवणे फायदेशीर ठरते.

आंबा : पूर्ण वाढलेल्या झाडास (१० वर्ष व अधिक) जून-जुलै महिन्यात ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (१५००:५००:५०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) दीड किलो युरिया, तीन किलो एसएसपी व एक किलो एमओपी द्यावे. सप्टेबर व फेब्रुवारी महिन्यात पाऊण किलो युरिया प्रत्येकी द्यावा.

चिकू : पूर्ण वाढलेल्या प्रत्येक झाडास १०० किलो शेणखत,शिफारशीत खत मात्रा (३:२:२ किलो/झाड नत्र:स्फुरद: पालाश) तीन किलो नत्र (६.५ किलो युरिया),दोन किलो स्फुरद (१२.५ किलो एसएसपी) व दोन किलो पालाश (३.५ किलो एमओपी) जुन-जुलै महिन्यात द्यावे. उर्वरित निम्मा नत्राचा हफ्ता सप्टेंबर मध्ये द्यावा.

पेरू : पूर्ण वाढलेल्या पेरूच्या झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (९००:३००:३०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद: पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया,दोन किलो



एसएसपी व अर्धा किलो एमओपी द्यावे. यापैकी निम्मे नत्र ( एक किलो युरिया) बहारच्या वेळी व उरलेला नत्र फलधारणेनंतर द्यावा. तर स्फुरद व पालाश एकाच हफ्त्यात बहारच्या वेळी द्यावे.

अंजीर : पूर्ण वाढलेल्या अंजिराच्या झाडास, अंजिराची झाडे सुप्तावस्थेत असताना बागेत खोल खादंणी करावी. प्रत्येक झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (९००:२५०:२७५ ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद: पालाश) दोन किलो युरिया, दीड किलो एसएसपी व एक किलो एमओपी छाटणी नंतर द्यावे. फळधारणेनुसार नत्र(युरिया ) दोन वेळा विभागून एक महिन्याच्या अंतराने द्यावे.

लिंबू : पूर्ण वाढलेल्या चार वर्षांच्या लिंबूच्या झाडास जून-जुलै महिन्यात १५ किलो शेणखत,१५ किलो निबोळीपेंड शिफारशीत खत मात्रा (६००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) सुफला (१५:१५:१५) एक किलो, अर्धा किलो एमओपी द्यावे. सप्टेबर महिन्यात ३०० ग्रॅम युरिया व जानेवारी महिन्यात ३०० ग्रॅम युरिया द्यावा. वरील खतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम+ १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम+ १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे.सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता आढळल्यास ०.५ % झिंक सल्फेट, ०.५% मॅग्नेशियम सल्फेट,०.३% फेरस सल्फेट व कॉपर सल्फेट या सूक्ष्म अन्न्द्रव्याांची एकत्रित फवारणी करावी.

मोसंबी : पूर्ण वाढलेल्या पाच वर्षांच्या प्रत्येक झाडास २० किलो शेणखत,१५ किलो निबोली पेंड,शिफारशीत खत मात्रा (८००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र: स्फुरद: पालाश) पुढील प्रमाणे विभागून द्यावे. जानेवारी महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मार्च महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मे महिन्यात ३५० ग्रॅम युरिया + ५०० ग्रॅम एमओपी, जुलै महिन्यात २५० ग्रॅम एमओपी, आणि सप्टेंबर महिन्यात २५० ग्रॅम एमओपी द्यावे. बहार घेताना याखतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम + १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम + १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे.

डाळिंब : पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत ४० ते ५० किलो (६२५:२५०:२५० ग्रॅम/ झाड नत्र:स्फुरद:पालाश) प्रती वर्ष, नत्र दोन समान हप्त्यात विभागून द्यावे.म्हणजेच बहार धरतेवेळी ७०० ग्रॅम युरिया,संपूर्ण एसएसपी १५५० ग्रॅम व एमओपी ४०० ग्रॅम उरलेले अर्धे नत्र(युरिया ७०० ग्रॅम) फळांच्या गाठी धरल्यानंतर २-३ वेळा विभागून द्यावे

नारळ : ५ ते ६ वर्षांच्या नारळाच्या झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (१०००:५००:१००० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद: पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया,तीन किलो सिंगल सुपर फॉसपेट आणि साडेतीन किलो म्यूरेट ऑफ पोटॅश तीन समान हफ्त्यात द्यावे.(जून-सप्टेंबर व फेब्रुवारी) पैकी संपूर्ण शेणखत व सिंगल सुपर फॉसपेट जून महिन्यातच एकाच वेळी द्यावीत.रोपे लावल्यानंतर पहिल्या वर्षी रोपांची मुळे ३० से.मी.अंतरापर्यंत सभोवती विखरून टाकावीत आणि खुरप्याच्या सहाय्याने मातीत मिसळावी. त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी खते देताना ३० से.मी.अंतर वाढवत जावे व पाचव्या वर्षी व त्या पुढे १.५ ते १.८० मीटरपर्यंतच्या अंतराने ती पसरून टाकावीत आणि ती मातीत मिसळावी.

## आभाळ फाटलंय;शेतकऱ्यांचे नशिब फुटलंय

सरकारी यंत्रणा बघ्याची भुमिका घेऊन बसलीय पाऊस पडो की न पडो ,आमचे पगार चालूच आहेत की म्हणणं बरोबर नाही बरं .... पाऊस पडो की न पडो ,आमचे पगार चालू राहतात असे एक वाक्य काही दशकांपूर्वी प्रसिद्ध अर्थतज्ञ वि.म. दांडेकर बोलले होते. आज अतिवृष्टीने शेतीची जी भयानक स्थिती झाली आहे तेव्हा ते वाक्य आठवले. नोकरी करणाऱ्या व्यक्ती आणि शेतकरी यांची तुलना वि.म.दांडेकर यांनी केली होती. केवळ वेदना समजावून घेण्यासाठी हे रूपक वि. म. दांडेकर यांनी वापरले होते हे लक्षात घ्यायला हवेच उगाचच त्यांनी नोकरदारांवर टीका केली म्हणून गळे काढण्यात अर्थ नाही बरं का ...

जुन्या काळी लोक म्हणतं उत्तम शेती ,मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी अशी मांडणी पूर्वी केली जायची पण आजच्या काळात शेतीची जी दुरावस्था झाली आहे ती अतिशय वेदनादायक आहे. आज वर्तमानपत्रांमध्ये शेतीची मातीच वाहून गेली आणि फक्त खडक, दगड शेतात उरले असे फोटो बघून अक्षरशा वेदना झाल्या त्या फक्त शेतकरी बांधवांना व संवेदनशील व्यक्तिंना. पण सरकारी यंत्रणा आपण काहीच करू शकत नाही ही आपली मर्यादा अधिकच अस्वस्थ करतेय असे वाटते कारण अधिकारी वर्गाने ठरवले तर नक्कीच शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत होऊ शकते बरंका .शेतीच्या प्रचंड नुकसानीचे फोटो बघून आणि बातम्यांमधून शेतकऱ्यांचे अश्रू संवेदनशील माणसाचं हृदय पिळवटून टाकतात.जेव्हा दुष्काळ असतो तेव्हा आकाशाकडे बघणारे शेतकरी आणि जेव्हा ओला दुष्काळ असतो. तेव्हा मान खाली घालून पाण्याकडे बघणारा शेतकरी या दोन टोकातून शेतकऱ्याची कधी सुटकाच होणार नाहीच का बरं ....?





दांडेकर म्हणाले होते तसे खाजगी क्षेत्रातील पगार आणि सरकारी क्षेत्रातील पगार हे तुलनेत स्थिर असतात. दांडेकर यांना असे म्हणायचे होते की निसर्गाच्या ऋतुचक्राचा फटका या स्थिर वर्गाला फार बसत नाही अगदी कोरोना काळात सुद्धा सरकारने कर्मचाऱ्यांना त्यांचे पगार दिले. दांडेकर यांना असे म्हणायचे होते की असा एक वर्ग असतो की ज्या वर्गाला सरकार पूर्ण संरक्षण देते त्या वर्गाच्या कुटुंबाची काळजी घेते इतकेच काय त्यांच्या मृत्यूनंतरही कुटुंबाची काळजी घेते त्याबद्दल तक्रार काहीच नाही. ते करायला हवेच पण ही संवेदनशीलता शेतकऱ्यांबद्दल कुठे जाते बरं ..? शेतकऱ्यांसाठी ज्या ज्या विभागाने उपाययोजना केल्या पाहिजेत ते पण पाऊस सुरू असताना आणि पाऊस थांबल्यावर पण निवांत बसून असतात त्यांना सरकारी पगार आणि मलिदा खाताना लाज वाटत नाही का बरं....? काल उभ्या पिकात नदी नाले ओढे यांचे पाणी घुसून प्रचंड नुकसान झाली आहे हे रोखता नक्कीच आले असते त्या नदी नाले ओढे यांची वेळीच दुरुस्ती वैगरे केली असती तर पण ते कोणी करावे कारण या देशात अशी व्यवस्था आहे. घटना घडल्यावर मलमपट्टी केली जाते. उभ्या सोयाबीन, बाजरी, तुर , भाजीपाला व कापसाच्या शेतात साठलेल्या पाण्यामध्ये पोहणारे तरुण बघितले ते हसत होते पण त्यांच्या हसण्या मागे दुःखाच्या वेदना पाहिल्या नाहीत कोणीचं. पुन्हा या अतिवृष्टीतून शेतकऱ्यांची सुटका नाही जी पिके वाचतीलच त्याला पण पुढे पाऊस येणारच आहे आणि त्यातूनही काही पिके व फळबागा वाचल्या तर पुन्हा मार्च एप्रिल मध्ये येणारा पाऊस किंवा कडक उन्हाळा त्यांनाही उध्वस्त करून टाकेल. साधं आपले १० रुपये हरवलं तर दिवसभर चुटपुट लागते. पण डोळ्यासमोर आलेल्या पिकातून कर्ज फेडायचे किंवा डोळ्यासमोर आलेल्या पिकातून आपल्याला दारिद्र्यातून किमान एक पाऊल बाहेर निघता येईल अशी स्वप्न बघायची आणि क्षणात होत्याचे नव्हते झाले आहे तरीही कशी मन:स्थिती टिकवत असतील शेतकरी जरा विचारा आपल्या अंतःकरणाला महसूल , कृषी आणि जलसंधारण खात्यात मलिदा खातं बसलेल्यांनो ...?

खत आणि बियाणे उधारीवर घेतलेले असते त्या दुकानदारालाही शेतकरी सांगतात की पीक विकलं की तुझे पैसे देतो असे सांगणारे शेतकरी त्या दुकानावर आता काय घेऊन जातील ते सांगा बरं शासनकर्ती मंडळींनो मुला मुलींचे शिक्षण, लग्न, समोर ठेवलेली स्वप्नं क्षणात वाहून जाताना काय वाटत असेल ? आज राजकीय मंडळी कोणाचा तरी वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात व्यस्त आहेत पण मराठवाड्यातल्या खेड्यापाड्यातील रडणारा शेतकरी आठवत नाही. मान टाकलेला कापूस आणि बुडालेला सोयाबीन दिसत नाही यांना राजवटी बदलल्या निजामाची राजवट जाऊन आम्ही आमचे सरकार आणले हे नक्कीच चांगले झाले पण शेतकऱ्याच्या गुलामगिरीचे काय ? शेतकऱ्याला आज जी अस्थिरता आहे त्या राजवटीतही होती आणि या राजवटीत आहे. कितीही नुकसान झाले तरी त्याला किमान जगण्याचा आधार देईल अशी व्यवस्था कधी निर्माण होईल...?विलक्षण अस्वस्थता वाटते माझ्या शेतकरी बांधवांच्या समस्या पाहुन पण येथे राज्यकर्ती आणि शासनकर्ती मंडळी निवांत आहे हे निष्ठुर आहेत असेच म्हणावे लागेल. पण दुर्दैवाने या दुःखालाही आता रिल्स्? सारखे अल्प आयुष्य येणार आहे . काही दिवसात या बातम्या उरतील फक्त शेतकरी आणि संवेदनशील व्यक्ती यांच्या लक्षात पण सरकारी यंत्रणा विसरून जाईल हे सर्व आणि या राज्यात पुन्हा फुगतील आत्महत्यांचे आकडे .....

**श्री बाजीराव नवनाथ ढाकणे**
बीड जिल्हा समन्वयक, महाएनजिओ फेडरेशन,महाराष्ट्र राज्य
मोबाईल ९४२१९८९९०९

# अतिवृष्टीचा ३५७ गावांना फटका; १ लाख ८७ हजार ४८५ हेक्टरवरील पिके पाण्यात

## ३४ हजार ६१० हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा कमी नुकसान

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यात १३ ते १५ सप्टेंबरदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील ७ तालुक्यांतील ३५७ गावांमधील १ लाख ८७ हजार ४८५ हेक्टर क्षेत्रावरील पिके पाण्याखाली गेली आहेत. या पावसामुळे १ लाख ५३ हजार ८१४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात १ लाख ८ हजार २७१ हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाले. पाऊस थांबल्यानंतर अंतिम पंचनामे प्रशासनाने सुरू केले असले तरी अधुनमधून सुरु असलेल्या पावसाचा अडथळा या पंचनाम्यांना येत आहे. दरम्यान पुढचे तीन दिवस पावसाचा 'येलो अलर्ट' जारी केला आहे.



१३ व १४ सप्टेंबरला सर्वाधिक पाऊस झाला, त्याचा सर्वाधिक फटका अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर ,पाथर्डी, कर्जत, जामखेड, श्रीगोंदे, नेवासे, शेवगाव या ७ तालुक्यांना बसला. या तालुक्यांतील ३५७ गावांमधील १ लाख ८७ हजार ६७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. यात बाजरी, कापूस, तूर, मुग, उडीद, डाळिंब, सीताफळ, संत्रा, कांदा, मका, सोयाबीन, भाजीपाला,कापूस या पिकांचे नुकसान झाले. यात ७४ हजार १५७ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाले. ३४ हजार ६१० हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा कमी नुकसान झाले. यात ४५ हजार ५४३ शेतकरी बाधित झाले. दरम्यान, १५ सप्टेंबरला झालेल्या अतिवृष्टीमुळे ३९४ हेक्टरचे नुकसान झाले, यात ४९५ शेतकऱ्यांना फटका बसला. जून, जुलै व ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारल्यानंतर सप्टेंबरच्या ८ दिवसांत पावसाने तुट भरुन काढली. जिल्ह्यात आतापर्यंत ९९.३ टक्के पाऊस झाला आहे. अवघा ३ मिमी पाऊस सरासरी ओलांडण्यासाठी आवश्यक आहे. या कालावधीत जिल्ह्यात ३९४ मिमी पाऊस होत असतो, १९ पर्यंत ३९१.३ मिमी पाऊस झाला. गेल्या २४ तासांत १४. ४ मिमी पाऊस झाला. १३ व १४ सप्टेंबरच्या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका पाथर्डी, शेवगाव तालुक्याला बसला आहे. पाथर्डी तालुक्यातील ११४ गावांतील ४९, ८१८ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. त्याचा ६९ हजार शेतकऱ्यांना फटका बसला, त्या खालोखाल शेवगाव तालुक्यातील ११३ गावांतील ५१,९९३ हेक्टरवरील ६९,१९३ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. कर्जत तालुक्यातील ६५ गावे व नेवासे तालुक्यातील प्रत्येकी ६५ गावांना फटका बसला. १५ दिवसांत नुकसानीचा अहवाल सादर होणार .पंचनामे पूर्ण कधी होतील ? .- ग्रामसेवक, कृषी सहाय्यक व तलाठी यांच्याकडून पंचनामे सुरु आहेत. ४ ते ५ दिवसांत पूर्ण होतील . आर्थिक किती नुकसान झाले ? .पंचनामे जोपर्यंत पूर्ण होत नाही,तोपर्यंत ते सांगता येणार नाही. . नुकसानीचा अंतिम अहवाल कधी सादर होणार ? .पुढच्या १५ दिवसांत अंतिम अहवाल सादर केला जाईल.

# श्री मत्स्योदरी देवीला १ तोळे सोने अर्पण

## संस्थान अध्यक्ष तहसिलदारांनी खरात सहकुटुंबांचा केला सत्कार



अंबड

शहरातील शिवसेना शिंदे गट युवा नेते राहुल व्ही.खरात यांच्या पत्नी दर्शना राहुल खरात यांनी काही दिवसांपूर्वी जालना जिल्ह्याचे आराध्य दैवत श्री मत्स्योदरी देवीला १तोळे सोने अर्पण करण्याचा नवस केला होता. दरम्यान आज (ता.१९) शुक्रवारी त्यांनी आपल्या खरात कुटुंबियांसह नवसपूर्ती केली. यावेळी संस्थानच्यावतीने अध्यक्ष तथा तहसीलदार विजय चव्हाण यांनी मत्स्योदरी देवीची प्रतिमा देवून खरात कुटुंबियांचा सन्मान केला.

मत्स्योदरी देवीच्या नवरात्री महोत्सवास सोमवार (ता.२२) पासून सुरुवात होत आहे.शिवसेनेचे(शिंदे गट) युवा नेते राहुल व्ही.खरात हे पत्नी दर्शना खरात यांनी बोललेला नवस फेडण्यासाठी आज सहकुटुंब मत्स्योदरी देवी मंदिरात आले. यावेळी मनोभावे दर्शन घेवून १ तोळे सोने अर्पण करण्याबाबत संस्थान अध्यक्ष विजय चव्हाण यांना म्हटले असता श्री. चव्हाण यांनी तुमचा सोने अर्पण करण्याचा नवसच आहे तर १तोळ्याऐवजी १ग्राम सोने अर्पण करा आणि उर्वरित रकमेतून संस्थानला आवश्यक असणाऱ्या वस्तू घेवून दया असे सुचविले. यावर खरात कुटुंबियांनी १ ग्राम सोने अर्पण करून उर्वरित रकमेतून संस्थानला आवश्यक असणाऱ्या वस्तू घेवून देण्याबाबत होकार दिला. यावेळी संस्थानच्यावतीने अध्यक्ष विजय चव्हाण यांनी खरात कुटुंबियांना मत्स्योदरी देवीची प्रतिमा भेट देवून आभार व्यक्त केले. यावेळी बबिता वसंतराव खरात, राहुल व्ही. खरात, सौ. दर्शना राहुल खरात, चि. राजयोग खरात, विरा गुरुचल, रित्विक खरात यांच्यासह संस्थानचे व्यवस्थापक कैलास शिंदे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागर,राजेंद्र मस्के पोहोचले शेतकऱ्यांच्या बांधावर



बीड प्रतिनिधी। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना खूप मोठा आर्थिक फटका बसला. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. गाव खेड्यातील नद्यांनी आपले पात्र सोडले, शेतामध्ये नदीचे पाणी घुसल्याने शेत जमीन वाहून गेली तर काही ठिकाणी पिके पाण्यामध्ये तरंगत असल्याचे दिसून येते. आज सकाळी बीड मतदारसंघाचे आ. संदीप भैया क्षिरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी चौसाळा व लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील काही गावांचा संयुक्तिक दौरा करून नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. आपल्या नुकसानीची कोणीतरी पाहणी करतय, आपलं दुःख जाणून घेण्याचा प्रयत्न करते या भावनेतून संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व्यक्त होत होते.

नुकसान भरपाई ची मदत मिळेल अशी अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. चौसाळा जि.प गटातील पिंपळगाव माळेवाडी साखरे बोरगाव लिंबागणेश गटातील मोरगाव जाधववाडी मुळूक लिंबागणेश ससेवाडी मांजरसुंबा या भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात महसूल चे नायब तहसीलदार, गटविकास अधिकारी,मंडल अधिकारी, संबंधित गावचे तलाठी, ग्रामसेवक,कृषी विभागाचे अधिकारी, एमएसईबी आदी विभागातील प्रशासकीय अधिकारी सहभागी होते. या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्यास हाती आलेले पीक गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी मावत नव्हते. कमी दिवसात येणारे सोयाबीनचे पीक चहु बाजूनी वेढलेल्या पाण्यात उभे असले तरी त्यावर लागलेल्या शेंगांचं पूर्ण वाटोळ झालेलं आहे. काही गावांमध्ये पडझड झाली असून अनेक शेतकऱ्यांच्या घरांना, शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र या इमारतींना ईजा पोहोचली. लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक झाले असून सध्या बाह्य रुग्ण सेवा कोठे सुरू करावी असा प्रश्न वैद्यकीय अधिकाऱ्या समोर पडला आहे. अतिवृष्टीमुळे शेतजमीन घर सार्वजनिक इमारती रस्ते पोल यांचे प्रचंड नुकसान झाले असून ग्रामीण भागातील भौतिक सुविधा पूर्वत सुरू करण्यासाठी निधीची तरतूद करावी. आणि सरसकट शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची आर्थिक मदत तातडीने दिली पाहिजे. अशी शेतकरी तथा ग्रामीण जनतेकडून मागणी केली जात आहे.

# अनुदान घोटाळयातील एक आरोपी अमरावती येथून जेरबंद

जालना। प्रतिनिधी

सदर प्रकरणात यापुर्वी मा. जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समीतीने चौकशी करुन यातील संबंधीत आरोपीतांनी स्वत:चे ओळखीचे, नातेवाईक, मित्र परीवार यांचे बनावट, दुबार, क्षेत्रवाढ, जिरायत जमीनी बागायत दर्शवीने, शासकीय जमीन (गायरान) नावावर दर्शवुन नैसर्गीक आपत्ती अनुदान याद मध्ये नावे अपलोड करुन त्याद्वारे शासनाकडुन मिळाणाऱ्या अनुदानांची २४,९०,७७,८११/- रक्कम आपसात वाटुन घेतलेली असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा रजीस्टर नंबर ४५३/२०२५ कलम ३१६(४),३१६(५), ३१८(४), ३२४(५), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३३९, २३८,३(५) सह ५२,५३ आपत्ती व्यवस्थान कायदा २००५ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयातील पहीला अटक आरोपीनामे सुशिलकुमार दिनकर जाधव हा अटक असुन त्यास ७ दिवसाचे पोलीस कोठडी नंतर मा. न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याने त्याची जालना कारागृहामध्ये रवानगी करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील फरार आरोपीतांचा शोध कामी मा. पोलीस अधीक्षक यांनी शोध घेणे साठी दिलेल्या आदेशाने आर्थिक गुन्हे शाखेतील आधिकारी यांना गोपनीय माहिती व त्यांनी केलेल्या तांत्रीक विश्लेषनानुसार गुन्हयातील फरार आरोपी शिवाजी श्रीधर ढालके हा अमरावती शहरात रहात असल्याची माहिती मिळाली त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेतील शोध पथक रवाना होऊन अमरावाती शहर येथे आरोपी नामे शिवाजी श्रीधर ढालके वय ३४ वर्षे, व्यवसाय नोकरी तलाठी तहसील कार्यालय अंबड, रा. उमरी बाजार ता. दर्यापुर जि. अमरावती. हा अमरावती शहर येथे मिळुन आल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाणे सखोल तपास सुरू आहे. सदर गुन्ह्यातील इतर फरार आरोपीतांचा शोध सुरू आहे.सदरची कामगीरी ही मा.श्री अजयकुमार बंन्सल पोलीस अधीक्षक , श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री सिध्दार्थ माने प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , श्री मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा , पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजानन भोसले, सागर बावीस्कर, दत्ता वाघुंडे, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, रविंद्र गायकवाड, शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला अंमलदार, जयश्री निकम, निमा घनघाव, मंदा नाटकर यांनी पार पाडली.

# लिंबागणेश येथील गतिरोधक प्रकरणी ठिय्या आंदोलन

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी वर भालचंद्र माध्यमिक विद्यालय व बसस्थानक परिसर हा अपघातप्रवण भाग असल्याने येथे गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ. गणेश ढवळे व पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार निवेदनांद्वारे व आंदोलनांद्वारे केली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी बीड श्री. विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार दि.२६ जून रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे, तसेच वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी घटनास्थळी पाहणी केली होती. यावेळी सूचनाफलक लावण्याच्या सूचना कंत्राटदार व महामार्ग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र पाहणीस तीन महिने उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर आज (दि.१९ सप्टेंबर) ठिय्या आंदोलन छेडण्यात आले.



दरम्यान, बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदिप क्षीरसागर हे अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी करण्यासाठी तालुक्यात आले असता त्यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांची व्यथा ऐकली. त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत गतिरोधकाचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी महादेव जायभाये, तलाठी गणपत पोतदार, ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर, सहाय्यक पोलीस फौजदार बाबासाहेब राख, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ग्रामस्थ तसेच डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षकांच्या बदलीने लिंबागणेश शाळेत भावनिक वातावरण

## शिक्षकांच्या कार्याला ग्रामस्थांचा सलाम; शिक्षकांच्या मनात गावाबद्दल कृतज्ञता

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आज (शनिवार) भावनिक वातावरणात निरोप समारंभ पार पडला. मुख्याध्यापकांसह चार शिक्षकांच्या बदलीमुळे विद्यार्थ्यांसोबतच ग्रामस्थांच्या डोळ्यात पाणी आले. शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांच्या वतीने या समारंभाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे होते. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर वाणी, अँड . गणेश वाणी,विक्रांत वाणी, भिमराव वाणी,बाळासाहेब मुळे, दामोदर थोरात, समीर शेख, रमेश गायकवाड, संतोष भोसले, अशोक जाधव, शेख अख्तर,सलीम शेख,चेतन कानिटकर, शिवाजी वाणी,बाळु मुळे, सुखदेव वाणी,संजय पावले यांच्यासह ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमापूजनाने झाली. नव्याने रुजू झालेले प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे, ज्योती सानप, गिते यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. ५ पैकी बदली झालेल्या मुख्याध्यापक आबासाहेब हंगे, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अमर पुरी, भारत चौरे, संदिपान आगाम व सहशिक्षिका श्रीमती माधुरी कुलकर्णी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार स्वीकारताना शिक्षकांच्या डोळ्यात अश्रू तरळले, भावना अनावर झाल्या. त्यांनी आपल्या मनोगतात गावातील शैक्षणिक



व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात डॉ.गणेश ढवळे म्हणाले की, लिंबागणेश शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ ज्ञानच नव्हे, तर चारित्र्य, संस्कार व सामाजिक जाण निर्माण केली. शाळेची गुणवत्ता उंचावण्यात त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शिक्षकांच्या सेवाभावी कार्याची उजळणी करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अतिशय वेदनादायी ठरला. ''आम्हाला सोडून जाऊ नका'' असा आक्रोश मुलांनी केला. अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या पायाला स्पर्श करून निरोप दिला. त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. हा निरोप समारंभ पालक, ग्रामस्थ व विद्यार्थ्यांच्या मोठ्या उपस्थितीमुळे संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक जाधव यांनी केले तर आभारप्रदर्शन हरिओम क्षीरसागर यांनी केले. प्रा. लेनाजी गायकवाड, बाळासाहेब मुळे, समीर शेख, रमेश गायकवाड या पालकांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

# कवितेचे होणारे सादरीकरण घेते रसिकांच्या मनाचा ठाव

## मोबाईलच्या आभासी दुनियेत माणूस स्वतःचे अस्तित्व विसरला-डॉ. दौंड

पाथर्डी। प्रतिनिधी

अल्पाक्षरत्व हे कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवी हा कवितेशी प्रामाणिक राहात जीवनाशी निगडित भावनांना शब्दबद्ध करत समाजात कवितेचे होणारे सादरीकरण रसिकांच्या मनाचा ठाव घेते, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. कैलास दौंड यांनी व्यक्त केले. येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय कवी संमेलनाला जिल्ह्यातून मान्यवर कवींसह नवकवींचा प्रतिसाद मिळाला. दोन सत्रांमध्ये झालेल्या कार्यक्रमास स्थानिक रसिकही मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शायर तथा कवी हाजी हुमायूनभाई आतार, तर उद्घाटक म्हणून माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, सचिव सुनील गोसावी, उपाध्यक्ष रवींद्र दानापुरे, कार्यवाह भारत गाडेकर, सुवर्णयुग मंडळाचे अध्यक्ष वैभव शेवाळे, कवी वसंत मुरदारे, ज्येष्ठ साहित्यिक बापूसाहेब



भोसले, राज्य संघटक डॉ. अशोक कानडे, प्राचार्य बबन चौरे, ज्येष्ठ कवयित्री माधुरी मरकड आदींच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा झाला.

डॉ. दौंड म्हणाले, सध्या संपूर्ण विश्व सोशल मीडियाच्या आहारी गेले आहे. कला, संस्कृती, साहित्य, गायन, अभिनय, अशा सर्व मनाला शांतता व समाधान देणाऱ्या कलाकृतींपेक्षाही मोबाईलच्या आभासी दुनियेत माणूस स्वतःचे अस्तित्व विसरला आहे. अशी ही झगमगटाची दुनिया कलेचा नाश व माणसाची भावना करपून टाकणारी आहे. जगण्यासाठी पैसा नको, सुख साधने नकोत किंवा मौजमजाही नको. तर सेवाभाव व त्यातून निर्माण होणारा स्नेहभाव हा आयुष्याच्या वाटचालीचा मुख्य प्रवाह असावा. या प्रवाहातून विविध कलांच्या माध्यमातून स्वतःबरोबरच समाज जीवन प्रगल्भ व अधिक सुसंस्कृत करण्याचे माध्यम म्हणून कथा, कविता, साहित्य, याकडे बघता येईल. शब्दगंध साहित्य परिषदेने राज्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात विशेषतः ग्रामीण भागात व नवोदितांमध्ये साहित्याची आवड निर्माण करून अनेकांना लिहिते केले आहे. बऱ्याच जणांना बोलते केले आहे. साहित्य क्षेत्रातील चौफेर योगदानातून या चळवळीने स्वतःची ओळख राज्याच्या साहित्यसृष्टीला करून दिली आहे. गावपातळीवरची कवी संमेलने नव्या पिढीला साहित्याची आवड निर्माण करण्यास फलदायी ठरतील असा विश्वास दौंड यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक माजी प्राचार्य जी. पी. ढाकणे यांनी, सूत्रसंचालन शर्मिला गोसावी व महादेव कोसे यांनी, तर आभार डॉ अशोक कानडे यांनी मानले.

# संत रामदास महाविद्यालयाचे अविष्कार स्पर्धेत यश

घनसावंगी। प्रतिनिधी

येथील संत रामदास महाविद्यालयास परतूर येथील लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात येथे पार पडलेल्या जिल्हा स्तरीय अविष्कार स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील अविष्कार स्पर्धेकरिता निवड झाली.

सदरी स्पर्धेकरिता कु. पठाण अनम मझरखान व कु. शेख नसीमा नियाज अहेमद या बी. एस्सी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांथीनी पक्ष्याची जैवविविधतेचा आवाजानुसार शोध यावर आपले शोधात्मक साजरीकरण केले या करिता त्यांना रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीपसिह गौर, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय सूर्यवंशी व डॉ. दिनेश खराटे यांनी मार्गदर्शन केले.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/५५६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०२/०९/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)अमोल नारायण गायकवाड सर्व्हे नं. ३६ प्लॉट नं.८४ सिटी सर्व्हे नं. १८६५/अ/८४ नं.प.मि.नं.१८-११८-८४/१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-११८-८४/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा

**पुर्व- सर्व्हे नं. ३६ चा भाग**
**कपील सुर्यकांत शेजुळ यांचे घर**
**पश्चिम : अनिल बबनराव वराडे यांचा प्लॉट नं. ८४ मधील राहते घर**
**दक्षिण- प्लॉट नं ८५**
**उत्तरः ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता**

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# तुझा मूळशी पॅटर्न करणार !

## अंबाजोगाई जवळ लोखंडी कत्तीनं तरुण व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**शहरालगतच्या मगरवाडी येथील एका तरुण व्यापाऱ्यावर लोखंडी कत्तीनं वार करून जीव घेण्याचा प्रयत्न झाल्याची खळबळजनक घटना १९ सप्टेंबर रोजी घडली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी गोपाल भागवत जाधव (वय २६, रा. मगरवाडी, ता. अंबाजोगाई) हे माऊली अ‍ॅग्रो एजन्सी नावाचे कृषी साहित्याचे दुकान चालवतात. १९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता ते आपल्या दुकानासमोर खुर्चीवर बसले असताना ओळखीचे जयपाल आशोक माने व त्याचा साथीदार निशांत विष्णु जागिर हे दोघे तेथे आले. त्यावेळी माने याने कपड्यात लपवलेली लोखंडी कत्ती काढून जाधव यांच्या मानेवर जीव घेण्याच्या उद्देशाने हल्ला केला. जाधव यांनी डावा हात वर केल्याने कत्तीचे



वार बरगड्यांवर व हातावर बसले. गंभीर जखमी अवस्थेतही त्यांनी कसाबसा जीव वाचवत पळ काढला.

दोन्ही आरोपींनी मोटारसायकलवरून पाठलाग करत ''आज माझा वाढदिवस आहे, तुझा मूळशी पॅटर्न केल्याशिवाय तुला जिवंत सोडणार नाही,'' अशी धमकी दिली. मात्र, जाधव यांनी गावातील सचिन भोसले यांच्या घरी आश्रय घेतला. त्यानंतर मित्रांच्या मदतीने त्यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात हजेरी लावली. जखमी असल्याने त्यांना तातडीने सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर हल्ला दिड वर्षापूर्वीच्या जुन्या घटने वादातून केल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. पोलीसांनी जयपाल आशोक माने व निशांत विष्णु जागिर या दोघांविरुद्ध जीव घेण्याचा प्रयत्न व धमकी यासह संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक रंगनाथ जगताप हे करत आहेत. दरम्यान, आरोपी जयपाल माने यासही सायंकाळी काही व्यक्तींनी बेदम मारहाण

## आ. धस यांच्यावर खालच्या पातळीवर टीका करणाऱ्या नवनाथ वाघमारेवर कठोर कारवाई करा

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी,पाटोदा,शिरुर कासार विधान सभेचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्यावर व्यक्तव्य करतांना अतिशय खालच्या पातळीवर जाऊन दोन समाजात तेढ निर्माण होईल असे केज येथील सभेत वक्तव्य करणाऱ्या नवनाथ वाघमारे यांच्या विरोधात पाटोदा तालुक्यातील समस्त ओबीसी समाज व इतर समाज एकवटला असून वाघमारे यांच्यावर कायदेशीर कठोर कारवाई करून गुन्हा दाखल करा अशी मागणी पाटोदा तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात असे म्हटले आहे की,गेल्या अनेक दिवसापासुन नवनाथ वाघमारे हा दोन समाजात तेड निर्माण होईल असे बेताल वक्तव्य वेगवेगळया समाज माध्यमातुन करत आहेत. तसेच



### पाटोदा तालुका समस्त ओबीसी समाज एकवटला, निवेदनाद्वारे मागणी

आष्टी/पाटोदा शिरुर कासार विधान सभेचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्यावर व्यक्त्यव्य करतांना अतिशय खालच्या पातळीवर जाऊन दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्त्यव्य कालच्या केज येथील सभेत केले आहे. त्याचा आम्ही सर्व ओबीसी समाज निषेध व्यक्त करत आहोत.

तरी बेताल वक्त्यव्य करणाऱ्या नवनाथ वाघमारेवर कायदेशिर कठोर कार्यवाही करुन त्यावर गुन्हा करा या मागणीचे निवेदन पाटोदा तहसीलदार यांच्याकडे दिले असून या निवेदनावर रामेश्वर गौरे,रोहिदास गीते,सचिन गाडेकर,गणेश रणदिवे,जितू सांगळे,किशोर अडागळे,नरेंद्र जावळे,अरविंद सरोदे,प्रकाश जावळे,किशोर नागरगोजे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## फसवणुक करून घरावर कब्जा

### घोळवे कुटूंबाकडून ढाकणे दाम्पत्याला मारहाण

बीड । प्रतिनिधी

**रामचंद्र विश्वनाथ घोळवे, कैलास घोळवे, विलास घोळवे, त्यांच्या कुटुंबासह २५ लोकांनी सावकारकीच्या पैशातून फसवून खरेदी केलेल्या व आम्ही राहत असलेल्या घरात घुसून जबर मारहाण केल्याची तक्रार सेवानिवृत्त शिक्षक दांपत्याने केली आहे. सावकाराच्या पैशातून घोळवे कुटुबीयांनी केलेल्या मारहाणीची पोलिसांनी दखल घेतली नाही. याप्रकरणी पोलीस अधीक्षकांनी दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे.**

यासंदर्भात पोलिसांना दिलेल्या निवेदनात अर्जदार सौ. ज्योती अशोक ढाकणे, रा.तुळजाई चौक, कॅनॉल रोड, बीड यांनी म्हटले आहे की, शनिवार दि.२०/०९/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास रामचंद्र विश्वनाथ घोळवे, विलास रामचंद्र घोळवे, कैलास रामचंद्र घोळवे, लहू थोरात, थोरात यांचा भाचा, चार महिलासह २५ जणांनी तुळजाई चौकातील माझ्या राहत्या घरी आले. आमच्या घरात शिरुन मला व माझ्या पतीला जबर मारहाण केली. यामध्ये माझे कपडे फाडले. छातीवर बुक्क्या मारुन लज्जास्पद कृत्य केले. यावेळी एकाने माझ्या गळयातील मंगळसुत्र हिसकावून घेतले. रामचंद्र विश्वनाथ घोळवे यांच्या कडून

पान २ वर

## हिवरसिंगा नदीवर ३ ठिकाणी नळकांडी पुल उभारा-ग्रामस्थ

शिरूर । प्रतिनिधी

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या पाहणीसाठी बीड विधानसभा क्षेत्राचे आमदार संदीप श्रीरसागर शिरुर तालुक्यातील मौ.हिवरसिंगा नदी क्षेत्रावर प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी ग्रामस्थांच्या वतीने श्री.विश्वांभर शिंदे,श्री.माऊली शिंदे,श्री.शिवराम राऊत सह ग्रामस्थ शेतकरी यांनी निवेदन देण्यात आले. हिवरसिंगा नदी ते कुटे वस्ती दरम्यान लक्ष्मीआई मंदीर वस्ती,शिंदे तिंकाडे वस्ती,कुटे-बडे वस्ती जवळ नदीवर पूल उभारण्याची आवश्यकता



आ.संदीप क्षीरसागर यांना ग्रामस्थांचे निवेदन

आहे.या पूला अभावी देवकर-नांगरे वस्ती,दुधाळ वस्ती, सानपवस्ती, शिंदे-तिंकाडे वस्ती,संतवामनभाऊ नगर वस्ती,मुस्लीम वस्ती,कुटे-बडे वस्ती,खंडोबा वस्ती वरील किमान ६०% पेक्षा अधिक ग्रामस्थ,शेतकरी,विद्यार्थी,महिला यांची रहदारी आसल्याने तसेच पावसाळ्यात नदीच्या पाण्यामुळे वृद्ध,रूग्ण,विद्यार्थी यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याने अनेक वर्षापासुन प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील नदीवरील पुल उभारण्यात आले नसल्याने रहिवासी यांनी प्रचंड त्रास सहन करत असल्याने आमदार महोदयांनी प्रत्यक्ष नदी क्षेत्रावर जाऊन पुलाची आवश्यकता समजाऊन घेतली.व लवकरच पुल मंजूरीसाठी प्रयत्न चालू करण्याचे यंत्रणेला आदेश दिले.तसेच शिवश्री कृषि मंडळ यांच्या वतीने देखील अतिवृष्टीने झालेले नुकसान झाल्याने ओला दुष्काळ जाहिर करणे व पीकविमा संबंधातील जाचक अटि वगळून मंजुर करण्याचे शासनाकडे शिफारस करावी करिता निवेदन दिले. यावेळी श्री.सुरेश घोळवे (तहसिलदार) इंजि.संदिपान शिंदे, श्री.बागलाने (गटविकास अधिकारी) श्री.येवले (उपअभियंता) श्री.राजेद्र मस्के (जिल्हाअध्यक्ष) श्री.मदन सर (मा.जि.प.सदस्य). श्री.वैजिनाथ नाना तांदळे,श्री.ज्ञानदेव सानप (मा.पं.स.सदस्य),दत्तात्रय शिंदे (मा.सरपंच) मंडळाधिकारी सानप,तलाठी गणेश बडे, मान्यवरांसह संदिपान सानप,लहू नांगरे,राहुल सानप,सतिश कुटे,लखन सानप,सह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## कंत्राटी कामगारांच्या न्याय व हक्कासाठी जोगदंड यांचे अन्नत्याग उपोषण

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील कार्यरत घनकचरा व्यवस्थापनातील कंत्राटी कामगार व परळी औष्णिक विद्युत केंद्रातील वीज कंत्राटी कामगारांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व कंत्राटी कामगारांना त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी रोजंदारी मजदूर सेनेच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून बुधवार दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर कंत्राटी कामगार प्रतिनिधी तथा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष



राजेश कुमार जोगदंड यांनी अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्या अधिनस्त कंत्राटदार व मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील सर्व विभाग प्रमुखांच्या अधिनस्त असलेले कंत्राटदार यांनी कंत्राटी कामगार ( नियमन व निर्मूलन ) अधिनियम १९७० आणि किमान वेतन अधिनियम १९४८ च्या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच महानिर्मिती प्रकाश गड बांद्रा पुर्व मुंबई व्यवस्थापनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाची सुद्धा काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी. याकरिता संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत बाबुभाई भालादरे यांनी रोजंदारी मजदूर सेनेच्या माध्यमातून कार्यरत कंत्राटी कामगारांना विशेष भत्ते मिळवून देण्यासाठी राज्यभर वंचित कामगारांचा लढा उभा केला व न्याय सुद्धा मिळवून दिला. परंतु अपवाद बीड जिल्हा राहिला

पान २ वर

## आमदार,खासदार,मंत्र्यासह प्रशासनाचे कोठारबनच्या दलित वस्तीकडे दुर्लक्ष!

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कोठारबन ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्तीमध्ये जाण्यासाठी भल्या मोठ्या नदीपात्रातून जावे लागत आहे. विद्यार्थी, डिलिव्हरीच्या महिला, व वृद्ध आणि इतरांनी कसं वागायचं? आमदार खासदार मंत्र्यासह प्रशासनानं सांगावं!

सविस्तर वृत्त असे की वडवणी तालुक्यातील गेल्या अनेक वर्षापासून दलित वस्तीचा

### भल्या मोठ्या नदीपात्रातून वागायचं कसं?



रस्ता झालेला नाही भल्या मोठ्या नदीपात्रातून विद्यार्थ्यांना, गरोदर मातांना, वृद्ध ,सर्वसामान्यांना नदीला पूर आला तर जाणं किती मुश्कील आहे हे त्यांनाच माहित आहे. कोरोना काळाच्या अगोदर पासून या नदीवरील पुलाचे इस्टिमेट तयार झालं होतं पैसाही आला होता मात्र त्या काळामध्ये तो पैसा इतरत्र वळविण्यात आला. स्वतंत्र पूर्व काळापासून स्वतंत्र पूल किंवा पर्याय व्यवस्था देण्यात आलेली नाही. या कोठारबनच्या दलित वस्ती कडे आजपर्यंतच्या लोकप्रतिनिधी सह प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. या नदीवरील पूल बांधून

पान २ वर

## नुकसानग्रस्त क्षेत्राचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा - डॉ. ज्योती मेटे

बीड । प्रतिनिधी

मागील पंधरवाडयात बीड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झालेली असून हजारो हेक्टर क्षेत्र वाधित झाले आहे. तसेच पशुधनाचेही अतोनात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त क्षेत्राचे तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांना तात्काळ मदत देणे आवश्यक आहे. शासनाने पिकविमा योजनेतील ट्रिगर बदलल्यामुळे शेतकऱ्यांना अग्रिम नुकसानभरपाई मिळु शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळाल्यास रब्बी हंगामातील लागवडीवर प्रतिकुल परिणाम होणार नाही. असे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदना द्वारे म्हटले आहे.



खरीप हंगमातील जिल्ह्याचे पीककर्ज वाटपाचे एकूण उदिष्टे १४४०कोटी पैकी दि. १५ सप्टेबर २५ अखेर ९७८.६२ कोटी एवढे वाटप करण्यात आले असून एकून टक्केवारी ६८ आहे तथापि ग्रामीण बैंक व खाजगी बँकेची टक्केवारी अनुक्रमे ७२ व ३२ एवढी आहे. ग्रामीण बैंक शेतकऱ्यांकरीता अर्थव्यवस्थेचा कणा असून ग्रमीण बँकेकडून केवळ ३५५३१ एवढ्या खातेधारकांना कर्ज वाटप करण्यात आले आहे. तर खाजगी बँकांनी केवळ १३९३ खातेधारकांना कर्जवाटप केले आहे. पैकी 'अ‍ॅक्सेस व कोटक

पान २ वर

## खा. बजरंग सोनवणे यांचे अंमळनेर रेल्वे स्थानकावर जोरदार स्वागत!

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड-अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे,खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.उद्घाटन समारंभानंतर खा. बजरंग सोनवणे यांनी याच रेल्वेत अंमळनेर रेल्वे स्थानकापर्यंत नागरिकांसोबत प्रवास करीत पहिल्या वहील्या रेल्वेचा आनंद लुटला.

खा.बजरंग सोनवणे अंमळनेर रेल्वे स्थानकात पोहचताच त्यांचे अंमळनेरकरांनी जोरदार स्वागत केले. फटाक्यांची आतिषबाजी,हालगीची थाप आणि मोठा हार देऊन स्वागत केले.

या प्रसंगी,घोषणांनी रेल्वे स्थानक दणाणुन गेले.बीड का खासदार कैसा हो,बजरंग बप्पा जैसा हो,बजरंग बप्पा तुम्ह आगे बडो हम तुम्हारे साथ है, अशा घोषणा देण्यात आल्या तर बजरंग सोनवणे यांचा फोटो असलेले फलक मोठ्या संख्येने युवकांच्या हातात दिसले.रेल्वे अंमळनेर रेल्वेस्थानकात पोहचल्यावर खा.बजरंग सोनवणे खाली उतरताच

पान २ वर

## एसपी साहेब, पाटोद्यात नेमकं चाललंय तरी काय? पोलीस संख्येत वाढ होऊनही गुन्हेगारी कमी होईना

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नागरिक सलग घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे अस्वस्थ झाले आहेत. अलिकडच्या काळात थेरला येथे दरोडा, पारनेर येथे चाकूहल्ला, तर बेलेवाडीत तलवार सापडल्याची घटना घडली. या सलग प्रकारांनी तालुक्यात असुरक्षिततेची भावना वाढत चालली आहे.पोलीस संख्या वाढली, पण परिणाम शून्य गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांची संख्या वाढविण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत त्याचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. गुन्ह्यांचे प्रमाण कमी



न होता दिवसेंदिवस वाढतेच आहे. त्यामुळे नागरिकांचा संताप व्यक्त होत असून प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मुख्यालयात वास्तव्यास राहण्याचे आदेश तरीही बाहेरगावाहून ये-जा पोलिस कर्मचाऱ्यांना पाटोदा मुख्यालयात वास्तव्यास राहण्याचे आदेश आहेत. मात्र, प्रत्यक्षात बहुतांश पोलीस कर्मचारी बाहेरगावाहून रोज ये-जा करत असल्याचे चित्र समोर आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.अचानक गंभीर घटना घडल्यास तातडीने पोलीस घटनास्थळी पोहोचतील का? हा प्रश्न जनतेच्या मनात

पान २ वर

## नारायणगडच्या दसरा मेळाव्यासाठी स्वयंसेवक श्रमदानातून करु लागले तयारी

### मठाधिपती शिवाजी महाराज यांच्या हस्ते झाला शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगड चे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत दि.२ ऑक्टोबर रोजी नारायणगड च्या या या वर्षीचार दसरा मेळावा घेण्यासाठी सर्व भक्तगणासह जात धर्म पंथ समाजातील पंथातील भक्तगण सरसावला आहे. हा दसरा मेळावा मोठ्या उत्साहात पार पडण्यासाठी स्वयंसेवक तनमनधनाने श्रमदानातुन तयारी करु लागले. या



कामाचा शुभारंभ मठाधिपती शिवाजी महाराज, संपादक गंगाधर काळकुटे पाटील, स्वयंसेवक यांच्या उपस्थितीत झाला.

धाकटी पंढरी नारायणगडावर मागील वर्षीचा दसरा मेळावा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक दसरा मेळावा लक्ष लक्ष चरण स्पर्शाने जागतिक स्तरावरचे रेकॉर्ड झाले. दरम्यान यंदाच्या दसरा मेळाव्याची घोषणा आझाद मैदानावरील आंदोलन हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट सह पाच मागण्या मान्य झाल्या व महाराष्ट्रातील समस्त मराठा बांधवांना आरक्षण विजयाचा विश्वास आनंद केला. मनोज जरांगे पाटील यांनी विजयी दर्शन दि.०८ सप्टेंबर नारायणगड नतमस्तक होऊन दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी दसरा मेळाव्याची घोषणा झाली. दरम्यान या अनुषंगाने

पान २ वर

### श्रमदानासाठी स्वयंसेवकांनी घेतला पुढाकार

आज दि.१९ सप्टेंबर रोजी पोखरी साठेवाडी काळेवाडी येथील गावकरी युवक महिला तसेच जेष्ठ नागरिक स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गडावर दिवसभर दसरा मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी शेकडो भक्तगण, समाजसेवक, दाखल होत असून आपला हातभार तन-मन-धनाने लावत आहे. यावेळी पोखरी, साठेवाडी काळेवाडी येथील गावकरी युवक महिला यांनी श्रमदान केले. या श्रमदानामध्ये संपादक गंगाधर नाना काळकुटे पाटील, माजी सभापती नारायण काशीद, युवा उद्योजक तथा गडाचे भक्त गणेश नलवडे, शिवव्याख्याते ज्ञानदेव काशीद, पत्रकार बाळासाहेब घाडगे, नवनाथ काशीद, गणेश हाडोळे रामप्रसाद पवार आदी नागरिक सहभागी होते. यावेळी गडाच्या वतीने वनभोजनाचा आस्वाद घेतला. तरी दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी स्वयंसेवक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

## संदेश पारखे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील हनुमंत गाव येथील तरुण संदेश पारखे हा आपल्या क्षणाबरोबर पोलीस दलामध्ये भरती होण्यासाठी फिजिकल फिटनेस शारीरिक क्षमता चाचणी यासाठी आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये प्रशिक्षण घेत होता शनिवारी सकाळी बेलगाव रस्त्यावर रनिंग करत असताना अचानक धावताना रस्त्यावर कोसळला अचानक कोसळल्याने इतर विद्यार्थी व शिक्षकांनी त्याला उठवून जागे करण्याचा प्रयत्न केला मात्र संदेश



पारखे हा तरुण हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्याचा जागीच प्राणज्योत मालवली होती विद्यार्थ्यांनी त्याला आष्टी येथील शासकीय रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले होते मात्र तरी देखील मित्रांचा व काही प्रियजनांनी त्याला अहिल्यानगर येथे उपचारासाठी अ‍ॅम्बुलन्स मध्ये घेऊन जात असताना मिरजगाव मध्ये कसल्याही प्रकारचे त्याच्या शरीरातून रिस्पॉन्स न आल्याने आता याला अहिल्यानगर नेण्यात अर्थ राहिला नाही हे लक्षात येताच त्याच्यासोबत

पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महापालिकेचा खड्डेमुक्त मोहीम जाहीर ; पण पोलिसांनीच खोदले ५५० किमी

पुणे । प्रतिनिधी

एकीकडे शहरातील रस्ते नोव्हेंबर अखेर खड्डेमुक्त करण्याचे आदेश महापालिका आयुक्त पथ विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांच्या उपअभियंत्यांना देत असताना दुसरीकडे पोलिसांकडून बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही प्रकल्पासाठी तब्बल ५५० किलोमीटरच्या रस्ता खोदाई सुरू आहे. यामुळे पालिका एकाचवेळी खड्डे भरा, खड्डे खोदा असा दुहेरी उपक्रम चालवत असल्याचे चित्र आहे. पोलिसांच्या खोदाईस पेठांपासून सुरुवात झाली असून पालिकेने २८ किलोमीटरच्या खोदाईस पावसाळा संपण्याआधीच परवानगी पोलिसांना दिली आहे.



त्यामुळे शहरातील रस्ते खड्डेमुक्त कसे होणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

शहराच्या सुरक्षेसाठी पोलीस नव्याने सीसीटीव्ही बसविणार आहेत. यासाठी शहरात सुमारे १६०० किलोमीटरची खोदाई केली जाणार आहे. त्यापैकी ५५० किलोमीटरची खोदाई पुण्यात होणार आहे. मात्र, ही खोदाई झाल्यानंतर रस्ते दुरुस्त करण्याची जबाबदारी गृह विभागाने पालिकेवर ढकलली आहे. प्रत्यक्षात कोणत्याही शासकीय विभागाने खोदाई केल्यानंतर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पालिका प्रती रनिंग मीटर साडेपाच हजार रुपये शुल्क आकारते.

हा नियम महावितरण, एनएनजीएल, बीएसएनएल या शासकीय कंपन्यांनाही लागू आहे. या पैशातून पालिका रस्त्यांची दुरुस्ती करत. मात्र, गृह विभागाने या कामासाठी नेमलेल्या ठेकेदाराने खोदाई केल्यानंतर त्याची दुरुस्ती पालिकेने करावी, अशी भूमिका घेतली आहे. यामुळे महापालिकेची दुहेरी कोंडी झाली आहे. आधीच शहरातील रस्ते खराब झाल्याने पालिकेकडून ते दुरुस्त करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची कामे केली जात असतानाच पुन्हा मोठ्या प्रमाणात रस्ते खोदावे लागणार आहेत. त्यामुळे पालिकेने नोव्हेंबर अखेर खड्डेमुक्ती मोहीम राबविण्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात खोदाईनंतर शहरभर रस्त्यांची दुरवस्था होणार आहे.

### पालिकेला उशीरा आली जाग..

सीसीटीव्हीसाठी रस्त्यांची खोदाई झाल्यानंतर हे रस्ते पूर्ववत करण्यासाठी पालिकेस तब्बल ४०० ते ५०० कोटींची खर्च येणार आहे. ही बाब माहीत असतानाही पालिकेने गृह विभागाचा आदेश आहे अशी भूमिका घेत रस्ते खोदाईस परवानगी दिली आहे. मात्र, आता रस्ते दुरुस्तीचा भार पालिकेवर येणार असल्याने तसेच नवीन रस्ते खोदल्याने केलेला खर्चही वाया जाणार असल्याचे लक्षात येताच, पालिका शासनास पत्र पाठवून खोदाई शुल्काची मागणी करणार आहे. पालिका आयुक्तांनी त्याबाबत पथ विभागास सूचना केल्या असून त्यानुसार, त्यांनी प्रस्ताव तयार केला आहे. तो गृह विभाग तसेच नगरविकास विभागास पाठविण्यात येणार असल्याचे पालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी स्पष्ट केले.

# पुरंदर विमानतळ देशात दुसऱ्या क्रमांकाचे असेल ; ३ वर्षांत काम पूर्ण करणार – उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

**पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी चांगला आराखडा बनविला आहे.देशातील दुसऱ्या क्रमांकाचे विमानतळ हे पुरंदर विमानतळ असणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. विमानतळ उभारण्यासाठी पाच वर्षे लागतात. मात्र, आम्ही तीन वर्षांत पुरंदर विमानतळ उभारू, असा विश्वासही पवार यांनी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री पवार यांनी नुकत्याच एका कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन केले.**



या वेळी पवार यांनी पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती दिली. पुरंदर विमानतळासंदर्भात बोलताना उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले, की पहिल्यांदा पुरंदर विमानतळासाठी अनेक जणांनी विरोध केला होता. आतापर्यंत ९० टक्के लोकांनी विमानतळासाठी संमती दिली आहे. पुरंदर विमानतळाचा आराखडाही चांगला बनविला असून, दोन धावपट्ट्या असणार आहेत. विकास अथवा सुधारणा करायाची असेल, तर हवेत करता येत नाही. त्यासाठी जमीन पाहिजे.आधी साडेसात हजार एकरावर विमानतळ करणार होतो. आता तीन हजार एकरवर विमानतळ उभारतोय.वरसगाव, खडकवासला, टेमघर ही धरणे बांधली. या धरणांचे पाणी आपण पितोय. त्यासाठी कुणाच्या तरी जमिनी गेल्यात ना? असा सवाल पवार यांनी केला. कुणाची तरी घरे गेली. वर्षानुवर्षे शेती करतात, पिढ्यानपिढ्या येथे राहतात. एवढे मोठे उजनी धरण बांधले. समुद्रासारखे ते दिसते. त्यासाठी पण अनेकांच्या जमिनी गेल्या आहेत. आता पुण्यातून रिंगरोड केला जात आहे. त्यासाठी चारपट मोबदला दिला आहे. यासह पीएमआरडीएचा रिंगरोडसुद्धा हाती घेतला आहे. आम्हाला कुणाला नाराज करायचे नाही; पण आमचा नाईलाज आहे, असेही पवार यांनी या वेळी सांगितले.

विमानतळापर्यंत मेट्रो..

शहरासह ग्रामीण भागात मेट्रोचा विस्तार करण्यात येणार आहे. मेट्रो चाकण, वाघोली आणि पुरंदर विमानतळापर्यंत नेणार असल्याचे पवार यांनी या वेळी सांगितले.

# तुम्ही बाहेरुन आलात, इथं दुकान लावू नका! पुण्याच्या तुळशीबागेत थरार, १० ते १२ जणांकडून दाम्पत्याला मारहाण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. कुठे गोळीबार तर हाणामारी अशा घटना घडत आहेत. आज देखील पुण्यात हाणामारीची घटना घडली आहे. पुण्यातील तुळशीबागेत दुकान लावण्यावरुन हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. १० ते १२ जणांकडून एका दाम्पत्याला मारहाण करण्यात आली आहे.

तुम्ही बाहेरुन आला आहात तिथे दुकानात लावू नका असे म्हणत केली मारहाण

दहा वर्षांपासून दुकान लावणाऱ्यांना इथे दुकान लावू नका असे म्हणत १० ते १२ जणांनी मारहाण केली आहे. तुम्ही बाहेरुन आला आहात तिथे दुकानात लावू नका अशा प्रकारची धमकी दिली आहे. पुण्यातील विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये काहीजण जखमी देखील झाली आहेत, ज्यांच्यावर रुग्णालयात सध्या उपचार सुरु आहेत. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुन्हेगारीच्या घटना वाढत असल्याचं चित्र पाहयला मिळत आहे. कुठं खून तर कुठं गोळीबार तर कुठं मारहाण



अशा घटना घडताना दिसत आहेत. अशा घटना घडू नये म्हणून पोलीस प्रशासन देखील सतर्क आहे. दोन दिवसापूर्वीच पुण्यात कुख्यात निलेश घायवळ टोळीनं घातला होता धुमाकूळ

गेल्या दोन दिवसापूर्वीच कुख्यात निलेश घायवळ टोळीने पुण्यात धुमाकूळ घातला होता. सलग दोन गंभीर गुन्हे केले आहेत. कोथरूडमधील मुठेश्वर परिसरात प्रथम ३६ वर्षीय प्रकाश धुमाळ यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्यानंतर काही अंतरावरच सागर साठे या तरुणावर कोयत्याने वार करून हल्ला करण्यात आला. एका रात्री दोन रक्तरंजित कृत्यांमुळे पुन्हा एकदा घायवळ टोळी चर्चेत आली आहे.या प्रकरणी पोलिसांनी टोळीतील मयूर कुंभार, मुसा शेख, रोहित अखाड, गणेश राऊत यांच्यासह आणखी एका साथीदाराला अटक केली आहे. सर्व पाचांवर दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केवळ गाडीला साईड न दिल्याच्या कारणावरून धुमाळ यांच्यावर गोळीबार झाला, तर सागर साठे यांच्यावर कोणतेही कारण नसताना फक्त दहशत पसरवण्यासाठी कोयत्याने वार करण्यात आला.मागील काही दिवसांपासून शांत असलेली घायवळ टोळी पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा स्थानिकांमध्ये रंगू लागली आहे. या घटनेत निलेशचा काही हात आहे का? याचा पोलिस तपास करत आहेत.

# पुण्यातील एमआयटी कॉलेज परिसरात आढळला मृतदेह, विद्यार्थ्यांची धावाधाव; पोलिसांनी घेतला शोध

पुणे । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांनी चर्चेत असलेल्या पुण्यातील एका महाविद्यालय परिसरात वयस्कर व्यक्तिचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. पुण्यातील एमआयटी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये हा मृतदेह आढळून आला आहे. याबाबत माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेहाची ओळख पटवत मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवला आहे. सुभाष कामठे असे ६५ वर्षीय मृत व्यक्तीचे नाव असून मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.**



सुभाष कामठे मूळचे पुण्यातील फुरसुंगी परिसरात राहण्यास असल्याची प्राथमिक माहिती असून ते गेल्या २ दिवसांपासून घरातून बेपत्ता होते. तसेच, कामठे यांना दारूचे देखील व्यसन असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. एमआयटी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये त्यांचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली असून विद्यार्थ्यांमध्येही भीतीचे वातावरण पसरले होते. शुक्रवारी दुपारी त्यांचा मृतदेह आढळून आला होता. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. दरम्यान, संबंधित व्यक्तीने आत्महत्या केली की त्याची हत्या करण्यात आलीय, याचा शोध पोलीस घेत आहेत. मात्र, दारुच्या नशेत पाण्यात उडी घेत संबंधित व्यक्तीने आमहत्या केल्याची चर्चाही परिसरात होत आहे.

# लोहाऱ्यात कार्यकर्त्यांचा मोठ्या उत्साहात शिवसेनेत पक्षप्रवेश



लोहारा –

धाराशिव जिल्ह्यातील शिवसेना अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने लोहारा तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मा. श्री. आनंद भैय्या पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत थोरात, लक्ष्मण जगदाळे, बालाजी मुळे, दत्ता मुळे, बळीराम धारुळे व उमर मुल्ला यांनी शिवसेनेवर विश्वास दाखवत जाहीर पक्षप्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक स्तरावर पक्ष संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.या प्रसंगी युवासेना धाराशिव लोकसभा अध्यक्ष मा. श्री. आनंद भैय्या पाटील, शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, उपनगराध्यक्ष अमीन सुंबेकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.कार्यकर्त्यांच्या या प्रवेशामुळे आगामी काळात शिवसेनेची ताकद वाढून पक्षाची घडण अधिक जोमदार होईल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# हुंडाबळीचा थरकाप.! मोटारसायकल न दिल्याने पतीकडून छळ; तरुणीची गळफास घेऊन

पुणे । प्रतिनिधी

**लोणीकंद परिसरात हुंड्यासाठी छळ सहन न झाल्याने एका २१ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. मृत तरुणीचे नाव अंजनीकुमारी शिवाजी मौर्या (रा. जि. बलरामपूर, उत्तर प्रदेश) असे आहे. या प्रकरणी लोणीकंद पोलिसांनी पती शिवाजी रमेशचंद्र मौर्या याच्याविरुद्ध हुंडाबळीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.**





फिर्यादी विजयबहादुर पतीराम मौर्या ( २७, जि. बलरामपूर, उत्तर प्रदेश) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, अंजनीकुमारी हिचा विवाह एप्रिल २०२४ मध्ये शिवाजी रमेशचंद्र मौर्या याच्यासोबत झाला होता. लग्नावेळी अडीच लाख रुपये रोख, सोन्याचे दागिने व संसारोपयोगी वस्तू देण्यात आल्या होत्या.तरीसुद्धा आरोपी पती शिवाजी मौर्या हा तुझ्या वडिलांनी अपाचे मोटारसायकल दिली नाही या कारणावरून सतत पत्नी अंजनीकुमारीला शिवीगाळ व मारहाण करत होता. दरम्यान ११ जुलै २०२५ रोजी शिवाजीने पत्नीला उत्तर प्रदेशहून लोणीकंद परिसरात आणून ठेवले. त्यानंतर त्रास अधिक वाढला.अंजनीकुमारीने १६ सप्टेंबर रोजी सकाळी वडिलांना फोन करून माझा छळ मला सहन होत नाही असे सांगितले. त्यानंतर तिच्या पतीने सासऱ्याला फोन करुन मी अंजनीला मारून टाकणार अशी धमकी दिली. या छळाला कंटाळून अंजनीकुमारी हिने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तिचा मृतदेह ससून हॉस्पिटलमध्ये शवविच्छेदनानंतर नातेवाईकांकडे सोपविण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा हा कसला जनसंवाद ? पत्रकारांशी नो संवाद

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड काळेवाडी रागा पॅलेस येथे २० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या जनसंवाद कार्यक्रमांमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील व सर्व भागातून भोसरी आळंदी चाकण तळेगाव काळेवाडी या सर्व भागातून अनेक ग्रामस्थ नागरिक आपल्या समस्या घेऊन आल्याचे दिसून आले सकाळी ९ वाजता दादा जनसंवादसाठी




तयार होऊन उपस्थित राहिले परंतु ५००० नागरिकांच्या समस्या पैकी काही मोजक्याच नागरिकांच्या साधारणता १७०० नागरिकांच्या समस्या सोडवून दादा दुपारी २ वाजता पत्रकारांसोबत संवाद न साधता पंचपक्वान्नाचे भोजन करून पुढील कार्यक्रमास रवाना झाल्याचे दिसून आले आज जो जनसंवाद झाला या अनुषंगाने समस्या ज्या काही सोडवले असतील त्याची माहिती पत्रकारांना दादा देतील अशी आशा होती परंतु दादांनी पाठ फिरवली पत्रकारांनी आपली पत्रकार परिषदेची पूर्ण तयारी केली असता दादांना स्थानिक पत्रकारांना संवाद साधण्यासाठी वेळ नसल्याचे त्यांच्या या वागण्यातून दिसून आले दादा आपण महाराष्ट्राचे लाडके दादा म्हणून ओळखले जातात सत्ता कोणाचीही असो उपमुख्यमंत्री दादाच असतील असे मानले जाते परंतु दादा आजचे तुमचे हे वागणे बरे नव्हे असेच म्हणावे लागेल.

# कोंढव्यातील व्यंकटेश सरोवर सोसायटीत कोयता गँगचा धुमाकूळ;

पुणे । प्रतिनिधी

शहरात सतत वाढणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असतानाच, शनिवारी मध्यरात्री कोंढव्यातील साईनगरमधील व्यंकटेश सरोवर सोसायटीमध्ये कोयता गँगने धुमाकूळ घातला.



सोसायटीचा जिन्याचा दरवाजा बंद असल्याने आरोपींना प्रवेश मिळाला नाही. मात्र, ते थेट पार्किंगमध्ये गेले आणि तेथे रहाणाऱ्या रखवालदारावर कोयत्याने व एअर गन दाखवून दहशत माजवली. आरोपींनी रखवालदाराचे दोन मोबाईल फोन व रोकड रक्कम लुटून पलायन केले.

गुन्हेगारांच्या हातात मोठे कोयते व एअर गन असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट झाले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून रहिवासी भयभीत झाले आहेत.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. मात्र, सतत सुरू असलेल्या गोळीबार आणि कोयत्यांच्या हल्ल्याच्या घटनांमुळे गुन्हेगारांना खाकीची भीती राहिलेली नाही, अशी चर्चा शहरात सुरू आहे.रहिवाशांचा सवाल : पोलिसांनी काही गुन्हेगारांच्या आर्थिक नाड्या आवळल्या तरीही त्यांचा दहशतीचा खेळ सुरूच असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार श्री महालक्ष्मी मंदिरातील ‘सार्वजनिक नवरात्रोत्सव’

पुणे । प्रतिनिधी

श्री महालक्ष्मी मंदिराच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सव सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ (घटस्थापना) ते गुरुवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत साजरा होणार आहे. या दरम्यान धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रमदेखील आयोजित करण्यात आले आहेत. संपूर्ण उत्सवात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांच्या हस्ते आरती, तसेच त्यांचा सन्मान सोहळादेखील आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ट्रस्टच्या विश्वस्त डॉ. तृप्ती अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, ॲड. प्रताप परदेशी, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर आदी उपस्थित होते.सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ (घटस्थापना) सकाळी ९.०० वाजता गोपालराजे पटवर्धन, पद्माराजे गोपालराजे पटवर्धन यांच्या हस्ते घटस्थापना होणार आहे. वंदे मातरम गीताला १५० वर्षे झाल्याच्या निमित्ताने त्यावर स्वतंत्र कार्यक्रम पहिल्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच, सायंकाळी ६ वाजता मंदिरावरील विद्युतरोषणाईचे उद्घाटन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते होईल.

याशिवाय दहा दिवसांत श्रीसूक्त अभिषेक, श्रीविष्णु सहस्रनाम पाठ, महालक्ष्मी महायाग, महाआरती असे धार्मिक कार्यक्रमदेखील मंदिरामध्ये होणार आहेत. सर्व धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य मिलिंद राहूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होईल.

याशिवाय नवरात्राच्या दुसऱ्या दिवशी सामूहिक महिला व पुरुष यांच्यासाठी श्रीसूक्त पठण, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, ढोल-ताशा वादन सेवा, नामांकित कंपन्यांमधील महिला एचआर, तसेच स्टार्टअप्स यांचा सन्मान, लेखिका कवयित्री सन्मान, कन्यापूजन, नारी तू नारायणी सन्मान सोहळा असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

यावर्षी नारी तू नारायणी हे पुरस्कार कु. पूजा मिसाळ, श्रीमती मीरा बडवे आणि



सिस्टर ल्यूसी कुरियन यांना देण्यात येणार आहेत. २३ तारखेला सायंकाळी डॉ. कल्याणी हर्डीकर यांच्या जागर विश्वजननीचा' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गो. बं. देगलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. मंजिरी भालेराव यांच्या शुभहस्ते होणार आहे. २४ तारखेला करवीरपीठाचे शंकराचार्य जगद्गुरु विद्या नरसिंह स्वामी महाराज उपस्थित राहणार आहेत.

२४ तारखेला छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य राज्याभिषेक सोहळा साजरा होणार आहे. २५ तारखेला महिला लष्करी अधिकारी यांचा ही सत्कार करण्यात येणार आहे. तसेच सांस्कृतिक उपक्रमांमध्ये भजन, पारंपरिक नृत्य, सामूहिक गरबा आणि प्रतीकात्मक रावणदहन कार्यक्रम ही यंदाची वैशिष्ट्ये असणार आहेत. धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा, समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा सार्वजनिक नवरात्रोत्सव महालक्ष्मी मंदिरात दर वर्षीप्रमाणे यंदाही साजरा होणार आहे.दसऱ्याच्या दिवशी गुरुवार, दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री महालक्ष्मी देवीला सोन्याची साडी परिधान करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू व ओटीचा कार्यक्रम होणार आहे, तर रात्री ९.३० वाजता रावणदहन कार्यक्रम होणार आहे. उत्सवात महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रांतील मान्यवर मंदिरामध्ये दर्शनासाठी येणार आहेत.तसेच भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने विमा घेण्यात आला आहे व मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात ५० सीसीटीव्ही कॅमेरे आणि ५०हून अधिक सुरक्षारक्षक असणार आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली असून, विशेष म्हणजे या वर्षी दिव्यांग बांधवांसाठी दुपारी अडीच ते साडेतीन या वेळामध्ये व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याद्वारे त्यांचे दर्शन सुखकर करण्याचा मंदिराच्या व्यवस्थापनाने प्रयत्न केलेला आहे तसेच राष्ट्रीय गीत वंदे मातरम' याच्या १५० वर्षपूर्ती सोहळ्याचे आयोजन मंदिरामध्ये करण्यात आले आहे.तरी या नवरात्र उत्सवात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांना पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे विश्वस्त मंडळाकडून आवाहन करण्यात आले आहे.